**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीराम बाबूराव बंडगर
१६५, गरीबी हटाव नं.१, अग्रवाल दवाखान्यामागे, विजापूर नाका, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर महानगरपालिका उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, इंदिरा प्राथमिक शाळा, इंदिरानगर,
विजापूर रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७९ / २००९ / सोलापूर व १२११ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |

**३. उपस्थित**
**अपीलकर्ता** श्री.श्रीराम बाबूराव बंडगर
१६५, गरीबी हटाव नं.१, अग्रवाल दवाखान्यामागे, विजापूर नाका, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर महानगरपालिका श्री.सत्यवान धर्मा सोनवणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, इंदिरा प्राथमिक शाळा, इंदिरानगर,
विजापूर रोड, सोलापूर सौ.सरस्वती गिरजप्पा जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> -

<u>अपील क्र. ६७९ / २००९ / सोलापूर</u>

मार्च १९९६ ते मार्च २००९ पर्यंतच्या शाळेच्या ऑडिट रिपोर्टच्या प्रती वारंवार मागूनही जन माहिती अधिकारी यानी दिल्या नाहीत. दि.१४.३.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याऐवजी श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.डी.डी.गाजरे यानी नाकारला. त्यानंतर पाठविलेली दोन पत्रेही मिळाली नसल्याचे मुख्याध्यापिका सौ.सरस्वती गिरजप्पा जाधव यांचे म्हणणे आहे. म्हणून अपिलीय प्राधिकारी प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. इंदिरा प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या समवेत अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे सुनावणी सुरु असताना श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.डी.डी.गाजरे यानी अनधिकाराने हस्तक्षेप करुन दमदाटी केली. त्याबद्दल त्यांच्या विरुध्द पोलिसांकडे तक्रारही दाखल केली आहे.

<u>अपील क्र. १२११ / २०१० / सोलापूर</u>

विडी कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु झाल्यापासून वर्षनिहाय वाटप केलेल्या शिष्यवृत्तीची मुलामुलींच्या व पालकांच्या सह्यांनिशी माहिती दि.१६.१२.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.८.१.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क मनिऑर्डरने पाठविल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२०.३.२०१० च्या पत्रान्वये आठ पानांच्या प्रती दिल्या. अपिलीय प्राधिकारी यानी दि.३०.३.२०१० च्या पत्रान्वये सूचना देऊनही जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती पुरविली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> -

<u>अपील क्र. ६७९</u> - मी फक्त पहिली ते चौथीपर्यंतच्या प्राथमिक शाळेची मुख्याध्यापिका आहे. श्री.बंडगर म्हणतात ते कोणतेही पत्र अथवा अर्ज मला मिळालेला नाही. माझ्या कालावधीत कोणतीही शिष्यवृत्ती आलेली नाही. श्री. बंडगर सातत्याने अर्ज व तक्रारी करीत असतात. त्यामागे त्यांचा त्रास देण्याचा हेतू आहे. तसे लेखी निवेदन मी पूर्वीही दिले आहे.

<u>अपील क्र.१२११</u> - श्री.बंडगर याना विहित मुदतीत उत्तर देऊन उपलब्ध माहिती दिली आहे. लेखातपासणी अहवालाच्या प्रती त्याना पूर्वीही दिल्या आहेत.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी याना सूचना दिल्या होत्या व वेळोवेळी माहिती दिली असल्याचे त्यानी सांगितले. शिष्यवृत्तीबाबतचे प्रस्ताव पालकांकडून पाठविले जात असल्यामुळे ती माहिती शाळा देऊ शकणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला आणि इंदिरा प्राथमिक शाळा, इंदिरानगर या दोन शाळांबाबत अपीलकर्ता श्री.बंडगर

सातत्याने अर्ज, अपिले व तक्रारी करीत असल्याचे दिसते. त्रास देण्याचा त्यांचा उद्देश असल्याचे दोन्ही शाळांचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे. हा तपशील लक्षात घेऊनही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत न करणे समर्थनीय ठरु शकत नाही. मात्र त्याच वेळी अपीलकर्त्यांनी माहितीच्या अधिकाराचा योग्य व सार्वजनिक हितासाठी वापर करणे अपेक्षित असल्याची समज अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

'श्री.श्रीराम बंडगर यानी माहिती अधिकाराखाली दि.१४.३.२००९ रोजी दिलेल्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर यानी दि.१९.९.२००९ रोजी श्री.बंडगर याना रजिस्टर्ड डाकद्वारे माहिती दिलेली आहे. सदर प्रकरणात वस्तुस्थितीचा विचार करता श्री.श्रीराम बंडगर व तत्कालीन मुख्याध्यापक, इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर यांच्या आपसात अन्य कारणामुळे मतभेद असल्याचे दिसून येत आहे. तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर यानी माहिती मुदतीत न देता ऊशिरा दिलेली आहे. म्हणून वेळेत माहिती देण्याबाबत ताकीद देणे योग्य वाटते, 'असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका श्री.सत्यवान धर्मा सोनवणे यानी सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर यानी श्री.बंडगर यांच्या दि.१४.३.२००९ च्या अर्जावर माहिती उशिरा दिलेली आहे. म्हणून 'वेळेत माहिती देण्याबाबत ताकीद देणे योग्य वाटते,' असेही त्यानी म्हटले आहे. परंतु अर्ज नाकारल्याबाबतची वस्तुस्थिती, अपीलकर्त्यांच्या अर्जांवर जन माहिती अधिकाऱ्यानी केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार तपशील आदी मुद्दयांचा समावेश अहवालात नाही. अशा प्रकारचा अपुरा व ढोबळ अहवाल सादर केल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका श्री.सत्यवान धर्मा सोनवणे याना समज देण्यात येत आहे.

दरम्यान जन माहिती अधिकारी सौ.सरस्वती गिरजप्पा जाधव यानी दि.२७.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला निवेदन सादर केले. श्री.बंडगर यांच्या अर्जाबाबत आपल्याला कोणतीही कल्पना नाही. या प्रकरणाशी संबंधित एकही कागदपत्र माझ्या दप्तरी नाही. शाळेची सर्व प्राथमिक व माध्यमिक विभागाची कागदपत्रे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.डी.डी.गाजरे यांच्या ताब्यात आहेत. माझ्या आधी तेच मुख्याध्यापक होते. आतापर्यंत झालेला पत्रव्यवहार व दिलेली माहिती याबाबत त्यानीच सर्व केले असून माझी सही दबावाखाली मुख्याध्यापक या नात्याने घेतली आहे. त्यामुळे मी कोणतीही माहिती वा खुलासा

देऊ शकत नाही. या सर्व कारणास्तव व दबावाला कंटाळून मी मुख्याध्यापिका या पदाचा राजीनामा देण्याचे ठरविले आहे, असे त्यानी या निवेदनात म्हटले आहे. निवेदनातील आशय अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. माहितीच्या अधिकारातील काम संबंधित जन माहिती अधिकाऱ्याला मुक्तपणे करता येत नाही व अन्य व्यक्ती त्यात हस्तक्षेप करीत आहेत. परिणामी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अपेक्षित असलेली सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता व उत्तरदायित्त्व या तत्त्वाना पोषक अशी ही परिस्थिती नाही. म्हणून याबाबत कसून चौकशी होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

(२) इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर प्रशालेच्या मुख्याध्यापिका यांचे दि.२७.५.२०१११ चे निवेदन लक्षात घेता श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला, सोलापूर या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.डी.डी.गाजरे यानी या निवेदनासंदर्भात व माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीविषयीचा खुलासा दि.१५.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर यानी इंदिरा प्राथमिक शाळा, विजापूर रोड, सोलापूर व श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला, सोलापूर या दोन्ही शाळांमधील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केली जाणारी कार्यवाही व सौ.सरस्वती गिरजप्पा जाधव यांचे निवेदन व श्री.बंडगर यानी अपिलाच्या सुनावणी दरम्यान श्री.गाजरे यानी हस्तक्षेप केल्याची तक्रार याबाबत सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि.२५.६.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास बब्रुवान शिंदे
मु.पो.वैराग (जंगले गल्ली ), ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |
| | **१. उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन २००० ते एप्रिल २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.मुजावर यानी ती आजपर्यंत दिली नाही.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरूपाची व ढोबळ मानाने माहिती मागितली आहे. त्यानी नेमकेपणाने माहिती मागितल्यास अथवा अभिलेखांचे अवलोकन करून कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केल्यास देणे सोयीचे होईल.

अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन रास्त आहे. तथापि हव्या असलेल्या नेमक्या माहितीची मागणी करण्यास अथवा अभिलेख अवलोकन करण्यास अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक आहे. तसे कळवून जन माहिती अधिकारी यानी आयोगास अवगत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कार्यवाही केल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एस.मुजावर यानी दि.२१.५.२०११च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यानी आयोगाकडून वारंवार स्मरण दिल्यानंतर ही कार्यवाही केली असून त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याची समज म्हणून त्याना शास्ती करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एस.मुजावर याना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याची समज म्हणून रूपये २५०० शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.मुजावर यांच्या जुलै २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या जून २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मं २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत सोपान लोखंडे
मु.सुपली, पो.पळशी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |
| **३. उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.जी.आंबेडकर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कालबध्द पदोन्नती व वेतन नियमबाहयरीत्या रोखले, शाळेत हजर करुन घेतले नाही, याबाबतचा तक्रार अर्ज अपीलकर्ता श्री.सूर्यकांत सोपान लोखंडे यानी शिक्षण उपसंचालक यांच्याकडे केला होता. त्या अनुषंगाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सन १९९७ ते २००९ या कालावधीतील वैयक्तिक मान्यतेविषयीची माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. अर्ज शाळेकडे वर्ग करुन माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यानी केले.

माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी १० दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्यास प्रशालेने तीन वेळा तीच माहिती दिली आहे, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे यानी दि.२१.५.२०११ च्या पत्रान्वये सादर केला. अहवाल विलंबाने पाठविल्याबद्दल जन माहिती अधिकारी श्री.जे.टी.खंडागळे याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव धोंडिबा बनसोडे
कुमठा नाका, सिव्हिल लाईन, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावलीबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती दिली नाही. सेवानिवृत्ती वेतनाचे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे व स्थगित केलेल्या वेतनासंदर्भात तपासणी करून कार्यवाही करण्याचे आदेश असतानाही त्यानुसार कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी.

अपिलीय प्राधिकारी : सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या नियमावलीच्या प्रती अपीलकर्त्यांनी मागितल्या आहेत. तसेच नियमविषयक अन्वयार्थाची मागणी त्यांच्या अर्जात समाविष्ट आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा अर्जावरील कार्यवाहीबाबतचा खुलासा दहा दिवसांत आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि अपिलीय प्राधिकारी यानी या आदेशाची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर याना दि.१०.५.२०११ च्या पत्रान्वये दिली व त्यानी दि.११.५.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची होती व शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांच्यासमोर त्याबाबत चर्चा होऊन कार्यवाही झाली आहे, असे त्यानी खुलाशात नमूद केले आहे.

आयोगाच्या आदेशानुसार विहित मुदतीत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांना न कळविणे व वारंवार स्मरण दिल्यानंतर अहवाल सादर करणे याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रावसाहेब बाबासाहेब मनगिरे
१८१९, आझाद चौक, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>१४६९/२०१०/सोलापूर</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि.</td></tr>
<tr><td colspan="3">१. उपस्थित<br>अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रावसाहेब बाळासाहेब मनगिरे यानी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची व संकलित करून देणे आवश्यक असल्यामुळे विलंब झाला. माहिती मिळाल्याची त्यांची पोहच आहे. अधिक माहिती हवी असल्यास अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत दि.१०.५.२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविण्यात आले असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तपशीलवार व आयोगाने दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश भिमराव जाधव
१६, सहयोगनगर, जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८८/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

तक्रारीबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.महेश भिमराव जाधव यानी केली होती. ती पुरविण्यात येत असल्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यानी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेशानुसार अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यानी अहवाल सादर केले. माहिती मिळाली असल्याचे अपिलकर्त्यांचे दि.१४.११.२०१० च्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे यानी दि.२१.५.२०११ च्या खुलाशासोबत सादर केली आहे. अतिरिक्त माहिती हवी असल्यास अभिलेखांचे अवलोकन करण्याबाबत अपिलकर्त्यास कळविण्यांत आल्याच्या पत्राची प्रतही त्यानी सादर केली आहे. आयोगाने विहित केलेल्या मुदतीत खुलासा/ अहवाल सादर न करण्या जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रंगराव कृष्णराव भोसले
व्दारा कमल टेलर्स, ३१११, ए ताराबाई रोड,
कोल्हापूर - ४१६ ०१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा. आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख,
अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७०/२०११/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रंगराव कृष्णराव भोसले
व्दारा कमल टेलर्स, ३१११, ए ताराबाई रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा. आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. संतोष जिरगे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख,
अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.प्रमोद सुधीर बराले

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा श्री. दिपक दादोबा टिकेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता (वय वर्षे ८१) - अतिक्रमणावरील कारवाईसाठी मी केलेल्या ३ अर्जांवरील केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. प्रकरण न्यायालयात असून महानगरपालिकेला पक्षकार केलेले असताना नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी- महानगरपालिकेला संबंधित न्यायालयीन प्रकरणात पक्षकार केल्याचे आधी माहीत नव्हते. इंटरनेटवर पाहिल्यावर/कागदपत्रे हाती आल्यानंतर ते कळले व लगेच तसे पत्र अपीलकर्त्यांना दिले.

अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून महानगरपालिका आयुक्तांनी त्यांचे तक्रार अर्ज अतिक्रमण विभागाकडे पुढील कारवाईसाठी पाठविले. तेही कळविले. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहितीही दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. मात्र जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.प्रमोद सुधीर बराले यानी माहिती देताना अधिक दक्षता घेणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव आप्पा मोरे
मु. पो. बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
बहिरेवाडी वि. का. स. सेवा संस्था मर्या., बहिरेवाडी,
ता. आजरा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. महादेव आप्पा मोरे<br>मु. पो. बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर श्री. एस.जी.झलग<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,<br>बहिरेवाडी वि. का. स. सेवा संस्था मर्या., बहिरेवाडी,<br>ता. आजरा, जि. कोल्हापूर श्री. बंडू गोपाळ मिलाळ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मौजे बहिरेवाडी विकास (वि. का. स.) सेवा संस्था मर्या., बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम व मतदार यादीची प्रत मागितली होती. ब वर्गातील सभासद अ वर्गात दाखवून निवडणूक घेतली आहे. ते बेकायदेशीर आहे. संस्थेला शासनाकडून भाग भांडवल व अर्थसहाय्य मिळत नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांनी अर्ज केला तेव्हा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला नव्हता त्यामुळे तो देणे शक्य नव्हते. कच्ची मतदार यादी तयार होती. त्याची प्रत शुल्क आकारुन दिली.

संस्थेला शासनाकडून भाग भांडवल, अनुदान इ. स्वरुपाची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरीव मदत मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे तिला उक्त अधिनियम लागू होत नाही. तरीही संस्थेच्या सचिवांनी माहितीबाबत कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्याच्या तक्रारी हा या अधिनियमाच्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सिंधू सोपानराव शिंदे
मु. पो. तांदूळवाडी, ता. कोरेगांव, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय कोरेगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय कोरेगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८५/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. सिंधू सोपानराव शिंदे
मु. पो. तांदूळवाडी, ता. कोरेगांव, जि. सातारा

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय कोरेगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा
श्रीमती जयश्री भागचंद आव्हाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्या - फेरफारानुसार मालकी हक्कात बदल करताना मूळ मालकांना बजावलेल्या नोटिसांची नक्कल, फेरफाराची नक्कल व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु दिशाभूल करणारी माहिती दिली. जमीन मी विकली आहे. परंतु न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नोंदी होणे आवश्यक आहे. त्या झालेल्या नाहीत.

अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांना सर्व माहिती दिली आहे. याच मागणीसाठीचे त्यांचे अपील क्र. १९५६/२००९ दि. ९.४.२०१० च्या आदेशान्वये आयोगाने निकाली काढले आहे. सर्व माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांनी त्या वेळी लेखी दिले आहे. त्यानी जमीन विक्री केली असून त्यानुसार झालेल्या फेरफारांची माहितीही दिलेली आहे. नसलेल्या जमिनीचा दाखला त्या मागत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य तक्रारी/मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. त्याना हवे असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मंगेश गोरख माने
मु. पो. भाडळी बुद्रुक, ता. फलटण, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु. पो. भाडळी बुद्रुक, ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मंगेश गोरख माने
मु. पो. भाडळी बुद्रुक, ता. फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. रमेश दामु काळे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु. पो. भाडळी बुद्रुक, ता. फलटण, जि. सातारा श्री. विजय तुकाराम हुंबे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी -** श्रीमती रेखा मानसिंग भंडलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नगर भूमापन विभागाकडून जागेची मोजणी झाली असून शेजारच्या मिळकतधारकाने माझ्या जागेत १० फूट अतिक्रमण केले आहे. त्याची मोजणी व्हावी व शेजारच्या मिळकतधारकाच्या बांधकामाबाबतची परवाना आदि माहिती मिळावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी कार्यवाही केली नाही.

जन माहिती अधिकारी - बांधकाम परवान्याची प्रत व अन्य माहिती अपीलकर्त्यांनी दि.३१.३.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दि. २७.४.२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने ती पाठविली. त्यानंतर याच संदर्भातील आणखी माहिती त्यानी दि. १०.५.२०१० च्या अर्जान्वये मागितली. ती दि. ४.६.२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने पाठविली. कोणतीही माहिती द्यावयाची राहिलेली नाही.

अपिलीय प्राधिकारी- शेजारच्या मिळकतधारकाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमानुसार ग्रामपंचायत दप्तरी नोंद करुन त्याचा उतारा अपीलकर्त्यांना द्यावा, असे आदेश अपिलावर दिले. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार मोजणी घेऊन न्यायालयाने निर्णय दिला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय सखाराम चिकणे
रा. कुसुंबी, ता. जावली, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय जावली, (मेढा),
ता. जावली, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय जावली, (मेढा),
ता. जावली, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय सखाराम चिकणे
रा. कुसुंबी, ता. जावली, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय जावली, (मेढा), ता. जावली, जि. सातारा
श्री. एन. एल. कुंभारे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसीलदार कार्यालय जावली, (मेढा),<br>ता. जावली, जि. सातारा श्री. शशिकांत आनंदराव घोलप |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता- जमिनीच्या फाळणी नकाशाप्रमाणे ७/१२ उतारा देण्याची मागणी केली होती. फाळणी नकाशा व नोंद होऊन मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अर्जाची चौकशी होऊन योग्य ती कार्यवाही होईपर्यंत फाळणी बारा प्रमाणे ७/१२ उतारा देता येत नाही, असे अपीलकर्त्यास कळविले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय संपतराव कणसे
मु. पो. गुणवरे, ता. फलटण, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
फलटण विभाग, ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
फलटण विभाग, ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६४/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विजय संपतराव कणसे
मु. पो. गुणवरे, ता. फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, फलटण विभाग,
ता. फलटण, जि. सातारा यांचे प्रतिनिधी श्री.आर.जी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, फलटण विभाग,
ता. फलटण, जि. सातारा श्री. संजयकुमार रघुनाथ चितळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -महाराष्ट्र शासनाच्या कृषी संजीवनी योजनेखाली थकबाकी माफी योजनेच्या संदर्भात मागितलेली माहिती परिपूर्ण दिलेली नाही. दि. ३०.३.२००५ रोजी मी भरलेल्या बिलाची मूळ प्रत मागणी करुनही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देत नाहीत. मी बिल भरलेले असूनही बिल भरले नसल्याचे अधिकारी म्हणत असल्यामुळे न्यायालयातील दाव्यात सादर करण्यासाठी मूळ प्रत हवी आहे.

जन माहिती अधिकारी- बिलाची मूळ प्रत एकदाच तयार होते व ती संबंधित ग्राहकाला दिली जाते. बिलाबाबत तक्रार असल्यास तो माहितीच्या अधिकाराखालील विषय नाही. अन्य कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि अपीलकर्त्यांच्या बिलाबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करणारे पत्र जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. इस्माईल गफूर शेख
१८९, नेहरुनगर, शुक्रवार पेठ,
फलटण, जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९८/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. इस्माईल गफूर शेख
१८९, नेहरुनगर, शुक्रवार पेठ, फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा यांचे प्रतिनिधी श्री. रमेश नारायणराव सबनीस

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा श्री. प्रकाश नारायण रणवरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मागणीनुसार कागदपत्रे मिळाली नाहीत. सही शिक्क्यानिशी नक्कल व नक्कल फी चा हिशेब दिला नाही. त्यामुळे जादा आकारणीची रक्कम परत मिळावी व जन माहिती अधिका-यांनी नकलांवर सही-शिक्का द्यावा.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांनी दि. १२.५.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती शुल्क भरल्यानंतर दि.८.६.२०१० च्या पत्रान्वये दिली. अपिलातील निर्णयानुसार सही-शिक्क्याच्या प्रती दिल्या. अपीलकर्त्यांचा विषय पतसंस्थेकडील वसुलीच्या संदर्भातील असून वसुली दाखलाही देण्यात आला आहे. कोणतीही माहिती द्यावयाची राहिलेली नाही. नियमाप्रमाणे कर्जफेड न करता विनाकारण पत्रव्यवहार करुन अपीलकर्ता त्रास देत असल्याचे पतसंस्थेने लेखी दिले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, फलटण, जि. सातारा श्री. प्रकाश नारायण रणवरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री. अरुण पांडुरंग काकडे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत न येणाऱ्या विषयांसाठी अर्ज/अपिले न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजय उत्तम पवार
७, शिवनगर हौसिंग सोसायटी,
कृष्णानगर, सातारा ४१५-००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५६/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अजय उत्तम पवार
७, शिवनगर हौसिंग सोसायटी, कृष्णानगर, सातारा ४१५-००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. डी.ए.डिंगरे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
यांचे प्रतिनिधी श्री. डी.ए.डिंगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अजय उत्तम पवार यानी दोन अर्जांव्दारे दोन जन माहिती अधिका-यांकडील माहिती मागितली होती. त्यांचा मूळ अर्ज आपल्या कार्यालयाला प्राप्त झालेला नव्हता. प्रथम अपिलाच्या अर्जावरुन त्याबाबत कळल्यानंतर माहिती निःशुल्क व त्वरित दिली. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, सोलापूर यांच्याशी संबंधित असलेली या अर्जातील माहिती त्यानीही पुरविली. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सुरेश द. जाधव यानी अपील निकाली काढले, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी यांचे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. गोविंद सांगडे यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. डी.ए.डिंगरे यानी पूरक कागदपत्रांसह सादर केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष आर. पाटील
३, जेल रोड, येरवडा, पुणे ४११ ००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा खनिकर्म अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, (खनिकर्म शाखा), पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा खनिकर्म अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, (खनिकर्म शाखा), पुणे<br>श्री. संजय महादेव बामणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुभाष आर. पाटील यानी खाणीबाबतच्या संचिकांच्या अवलोकनाची मागणी केली होती. त्यानी मागितलेली माहिती सुमारे २५ वर्षांपूर्वीची असून अभिलेखात शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही. तसे त्याना कळविले. अभिलेखांच्या वर्गवारीनुसार खानपट्टयांचे अभिलेख २० वर्षांपर्यंतच जतन करावयाचे असतात. त्यामुळे ते उपलब्ध करुन घेता येत नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, (खनिकर्म शाखा), पुणे श्री. संजय महादेव बामणे यानी केले.

संबंधित अभिलेख नष्ट केल्याची फेरिस्त यादी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार यादीचा शोध घेण्यात येत असल्याचे व अढळ होताच सादर करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, (खनिकर्म शाखा),पुणे श्री. संजय महादेव बामणे यानी दि.२२.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय लक्ष्मणराव बोरावके
स. नं. २९६, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे - १३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे - ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६०/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संजय लक्ष्मणराव बोरावके
स. नं. २९६, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे - १३

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतीश भोसरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. नंदकुमार शा. खळदकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी , जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी - श्री. जयंत मधुकर गायकवाड यांचा वहिवाटीचा रस्ता श्री. डॉन पॅट्रिक यानी श्री. गायकवाड यांच्या सोसायटीच्या गेटसमोर जाळया व लोखंडी तारा बसवून पूर्णपणे बंद केला आहे. त्याची परवानगी देण्यात आली असल्यास प्रत द्यावी, अशी मागणी माझ्या वडिलांनी केली होती. वारंवार मागूनही माहिती दिली जात नाही व वहिवाटीचा रस्ता बंद करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. त्यानी प्रथम अपील केलेले नाही. कारवाईची त्यांची मागणी प्रशासकीय स्वरुपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून कारवाईची त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि या प्रकरणासंदर्भातील अनुषंगिक माहिती/कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास ४ दिवसांत उपलब्ध करुन द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतीश भोसरेकर यानी दि. २४.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २५ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.हुसेनबाशा नबीसो मकानदार
मु.पो.होटगी स्टेशन, ता.दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कृषि परिमंडळ अधिकारी,**
दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा कृषि परिमंडळ अधिकारी,**<br>दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.श्रीकांत गंगाधर शिलवंत | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.१.५.२००८ ते दि.३०.१२.२००८ या कालावधीत आर.व्ही.पी योजनेतंर्गत करण्यात आलेली कामे व तद्संबधी एकूण ६ मुद्दे | |

**विवेचन**

'मी मागणी केलेल्या माहितीबाबत स्वतः तालुका कृषि अधिकारी, दक्षिण सोलापूर या कार्यालयात समक्ष हजर राहून कुरगोड गावाची दि.१.५.२००८ ते दि.३०.१२.२००८ या कालावधीतील माहिती तपशीलवार पाहिली असता माझे पूर्णतः शंकासमाधान झाले आहे. मी माहितीअर्ज गैरसमजुतीने व अनावधनाने दिलेला होता. सर्व माहिती पाहून माझे समाधान झाले असल्याने माझा आयोगाकडे

केलेला अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री.हुसेनबाशा नबीसो मकानदार यानी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 MAY 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भगवान लक्ष्मण मोरे
मोरे वस्ती, जाधववाडी (मो.), **अपीलकर्ता**
ता.माढा, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**
पंचायत समिती कुर्डुवाडी, ता.माढा,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका,**
ग्रामपंचायत जाधववाडी (मो),
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका,**<br>ग्रामपंचायत जाधववाडी (मो),<br>ता.माढा, जि.सोलापूर श्रीमती अनुजा अनिल बिनगे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),**<br>पंचायत समिती कुर्डुवाडी, ता.माढा,<br>जि.सोलापूर श्री.नंदकिशोर किसन बागवाले | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत जाधववाडी (मो.), ता.माढा च्या ग्रामसभा, मासिक सभा, ठराव पुस्तक, हजेरी पुस्तक व नोटीसा इ. संदर्भातील विस्तृत स्वरुपाची माहिती | |

## विवेचन

'मला मागणीप्रमाणे सर्व माहिती मिळाली असून माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.भगवान लक्ष्मण मोरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गिरीष मदन पाटील
मु.पो.बोरी, ता.इंदापूर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८६३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.गिरीष मदन पाटील<br>मु.पो.बोरी, ता.इंदापूर,<br>जि.पुणे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय इंदापूर,<br>ता.इंदापूर, जि.पुणे श्री.सर्जेराव कृष्णा लोणकर, लिपिक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** इंदापूर तालुक्यातील प्रलंबित रस्ते व पाईपलाईन कामांबाबत, तसेच विट भट्टया व वाळूच्या ठेक्यांबाबतची माहिती | |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार मला माहिती न मिळाल्याने आयोगाकडे अपील केले होते. दरम्यानच्या काळामध्ये मला संपूर्ण माहिती माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.गिरीष मदन पाटील यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नंदकुमार बाबूराव काळे
श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते
४१/४२, कमर्शियल बिल्डिंग नं.१,
मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-४११ ०३७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,**
भोर, ता.भोर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,**
भोर, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,**<br>भोर, ता.भोर, जि.पुणे<br>यांचे प्रतिनिधी श्री.दिलीप तुकाराम दुसाने, लिपिक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वन उपविभाग भोर च्या कार्यक्षेत्रातील सर्व तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण हमी योजनेची सन २००३-२००८ या कालावधीतील माहिती | |

**विवेचन**

'आमच्या मागणीप्रमाणे माहिती मिळाली असल्याने आमची तक्रार राहिली नाही. त्यामुळे सुनावणी रद्द करण्यात यावी', असे निवेदन अपीलकर्ता श्री.नंदकुमार बाबूराव काळे व श्री.माणिकराव त्रिंबकराव गोते यांनी दि.९.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.युसुफ फरिद शेख
आझाद चौक, कुपवाड,
ता.मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा आरोग्यधिकारी,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००७/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शौचालय बांधणीच्या प्रस्तावावरील कार्यप्रणालीची माहिती व लभार्थ्यांची नावे इ. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.युसुफ फरिद शेख यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.११.५.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'आरोग्य विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्याकडून मला सर्व माहिती उपलब्ध झाली असुन मला दिलेली माहिती परिपूर्ण आहे. माहितीबद्दल माझे पूर्ण समाधान झाले आहे. माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा. माझी काणेतीही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.शेख यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा

आरोग्यधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी दि.६.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.उमेश ज्ञानू मंडले
मंडलेवस्ती, महुद रोड, **अपीलकर्ता**
सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
सांगोला नगरपरिषद, ता.सांगोला,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा आस्थापनाधिकारी,**
सांगोला नगरपरिषद, ता.सांगोला,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७७/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा आस्थापनाधिकारी,**<br>सांगोला नगरपरिषद, ता.सांगोला,<br>जि.सोलापूर श्री.सुनिल नामदेव कोळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगोला नगरपरिषद कार्यालय जावक क्र सानपा/१३३०/०८ दि.१७.७.२००८ व सानपा/१३३१/०८ दि.१७.७.२००८ या पत्रांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापनाधिकारी, सांगोला नगरपरिषद, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी दिलेली माहिती मी पडताळून पाहिली असून सदर माहितीबद्दल माझे समाधान झाले आहे. त्यामुळे मी माझे अपील मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.उमेश ज्ञानू मंडले यानी दि.१०.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- २६ मे २०११** **राज्य माहिती**
**आयुक्त,**

**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सलीम नबीलाल नदाफ
१७१, गुरुवार पेठ, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक संचालक,**
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती,
विकास महामंडळ, जुहु सुप्रीम शॉपिंग सेंटर, पहिला मजला,
गुलमोहर क्रॉस रोड क्र.९ जे.व्ही.पी.स्किम (उत्तर), विलेपार्ले (प.),
मुंबई-४०० ०४९

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,**
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित,
महसूल कर्मचारी पतसंस्था इमारत, पहिला मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४५//सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या सोलापूर शहरातील विविध बँकामध्ये असणाऱ्या बचत व चालु खात्याबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सलीम नबीलाल नदाफ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. अपीलकर्ता श्री.नदाफ याना दि.९.११.२००९ रोजी समक्ष माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यानी श्री.नदाफ यांच्या पोहोचेसह आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अतुल अशोक बहुले
सिध्दार्थनगर, उरुळी देवाची, **अपीलकर्ता**
ता.हवेली, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.अतुल अशोक बहुले<br>सिध्दार्थनगर, उरुळी देवाची,<br>ता.हवेली, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,<br>खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२ श्री.पी.व्ही.धाणेपकर, लिपिक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे उरुळी देवाची येथील फेरफार क्र.४८०५ बद्दलची माहिती | |

**विवेचन**

'आयोगाने सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, पुणे यानी मला माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे माझी कोणतीही तक्रार नाही. माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री.अतुल अशोक बहुले यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अविनाश सुधाकर आवारे
संतपेठ, सांगोला रोड, **अपीलकर्ता**
भक्तीमार्ग, पंढरपूर, जि.सोलापूर-४१३ ३०४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
प्राथमिक आरोग्य केंद्र भोसे,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.अविनाश सुधाकर आवारे<br>रा.संतपेठ, सांगोला रोड,<br>भक्तीमार्ग, पंढरपूर, जि.सोलापूर-४१३ ३०४<br><br>**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**<br>प्राथमिक आरोग्य केंद्र भोसे,<br>ता.मंगळवेढा, जि.सोलापूर डॉ.पद्माकर अहिरे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रूग्ण कल्याण समितीमार्फत सन २००९-१० च्या अनुदानातून करण्यात आलेल्या खरेदीबाबत व तद्नुषंगिक एकूण ५ मुद्दे | |

## <u>विवेचन</u>

'आयोगापुढील सुनावणीतील मौखिक आदेशानुसार संपूर्ण माहिती मला प्राप्त झालेली आहे. मी समाधानी आहे. माझी काहीही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.अविनाश सुधाकर आवारे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, भोसे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर डॉ.पद्माकर अहिरे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.श्रीकांत चिंतामणी कांबळे
मु.पो.डोणोली, ता.शाहुवाडी,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट-अ),**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती शाहुवाडी,
ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.५.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत चरण, गजापूर, टेकोली, सौते, करंजफेण, मालगांव (जांभूर) इ. ग्रामपंचायतींनी दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत केलेल्या कामाची माहिती व कागदपत्रे | |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार संपूर्ण माहिती मला मिळाली असून माझे पूर्ण समाधान झाले आहे. माहितीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. माझे अपील मी मागे घेत आहे', असे अपीलकर्ता श्री.श्रीकांत चिंतामणी कांबळे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शाहुवाडी, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर यानी दि.२.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नारायण बाबुराव सुतार
१००५/३, म.न.पा.कॉलनी, **अपीलकर्ता**
शिवगौरी सोसायटी, राजेंद्रनगर,
पुणे-४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन),**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (भूमि आणि जिंदगी),**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६९/२०१०/पुणे<br>२७७२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.नारायण बाबुराव सुतार<br>१००५/३, म.न.पा.कॉलनी,<br>शिवगौरी सोसायटी, राजेंद्रनगर,<br>पुणे-४११ ०३०<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (भूमि आणि जिंदगी),**<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,<br>पुणे-४११ ००५ श्री.शिवाजी कोंडाजी लंके<br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन),**<br>पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, | |

| | |
|---|---|
| | पुणे-४११ ००५ श्री.सुधाकर बापूराव तेलंग |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१.तत्कालीन महापालिका सहाय्यक आयुक्त श्री.बाळासाहेब माळी यांच्या वरील दोषारोपासंदर्भातील माहिती<br>२.गुलटेकडी येथील सर्व्हे नं.५५७ भूखंड क्र.५६५ संदर्भातील कागदपत्रे |

**<u>विवेचन</u>**

'माझ्या माहिती अर्जातील माहिती मला मिळाली असून माझी कोणतीही तक्रार नाही. माझी दोन्ही अपिले निकाली काढण्यास हरकत नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.नारायण बाबुराव सुतार यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.उत्तम एच् भंडारे
रा.मिनाक्षी चित्रमंदिर समोर,
पलुस, ता.पलुस, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५४/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली आहे. | |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार माहिती मिळाली असून माझ्या थकीत पगाराची सन १९९७ पासूनची रक्कम मला मिळाली असल्याने मी माझे अपील मागे घेत आहे', असे अपीलकर्ता श्री.उत्तम एच् भंडारे यानी आयोगास निवेदन सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.पोपट अर्जुन दंडेल
मु.पो.सरडेवाडी, ता.इंदापूर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
इंदापूर नगरपालिका,
ता.इंदापूर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
लेखा विभाग, इंदापूर नगरपालिका,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी,**<br>लेखा विभाग, इंदापूर नगरपालिका,<br>ता.इंदापूर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.वैभव भ.देशमाने, लिपिक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आरोग्य निरीक्षक श्री.वैभव देशमाने यांच्या कार्यकाळात डिझेल मागणीसाठी वरिष्ठांकडे केलेल्या अहवालाची छायाप्रत, डिझेलची देयके, सर्व गाडयांचे लॉग बुक इ. ४ मुद्दे | |

**विवेचन**

'मी मागणी केलेली माहिती मला मिळाली असल्याने माझे अपील रद्द करण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.पोपट अर्जुन दंडेल यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कृष्णा धोंडप्पा चलवदे
ई/१, भाग्योदय, पी.डब्ल्यु.डी.हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
पारसी विहिरी समोर, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**<br>जिल्हा परिषद सोलापूर श्री.ए.जी.आंबेडकर | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.कृष्णा धोंडप्पा चलवदे यांच्या सहशिक्षक पदावरील मान्यता आदेशाची प्रत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.कृष्णा धोंडप्पा चलवदे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.११.५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला मागणी प्रमाणे माहिती मिळाली असल्याने माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.चलवदे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ए.ए.काझी
नुर बिल्डिंग, मालगांव रोड, खोतनगर,
मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५३/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली यांचे प्रतिनिधी अनिल पाटील<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,<br>सांगली श्री.नितिन कापडनिस | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या अरबी, उर्दू व मराठी या शिक्षण संस्थेच्या सुरु असलेल्या बांधकामाबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.ए.ए.काझी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.११.५.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला अपेक्षित असलेली माहिती मिळाली असल्याने माझे आयोगाकडील अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.काझी यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संदिप सयाप्पा गडदे
मु.पो.गौडवाडी, ता.सांगोला, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत गौडवाडी,
ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.संदिप सयाप्पा गडदे<br>मु.पो.गौडवाडी, ता.सांगोला,<br>जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**<br>ग्रामपंचायत गौडवाडी,<br>ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.अनिल विनायक पाडवी<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**<br>पंचायत समिती सांगोला,<br>ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.आर.पवार | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत गौडवाडीस सन २००५-२००९ या कालावधीत शासनाकडून मिळालेल्या निधीबाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.संदिप सयाप्पा गडदे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१८.३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मागणीनुसार माहिती मिळाली असल्याने माझी कोणतीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.गडदे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २६ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपती काशिनाथ कोरे
मु.पो.कवठेएकंद, ता.तासगांव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
तासगांव, ता.तासगांव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणपती काशिनाथ कोरे
मु.पो.कवठेएकंद, ता.तासगांव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली
प्रतिनिधी श्री.एम.आर.भाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -माझ्या क्षेत्राला पाण्याची व्यवस्था पाणीपुरवठा संस्थेने केली नसल्यामुळे क्षेत्रावरील कर्जाचा बोजा कमी करावा, या मागणीबाबत योग्य कार्यवाही केली जात नाही. शुल्क भरून घेऊन दिलेली माहिती उपयोगाची नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी कोणतीही माहिती मागितलेली नाही. कर्जाचा बोजा कमी करण्याची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.एम.आर.भाते यानी केलेले निवेदन योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश पांडुरंग जाधव
जुना समडोळी रोउ, अमर महाराष्ट्र चौक, मु.पो.सांगलीवाडी,
ता.मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कर निर्धारक व संकलक, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४७ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.नितीन कापडणीस

**जन माहिती अधिकारी** तथा कर निर्धारक व संकलक, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.चंद्रकांत भिवा चौधरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जादा घरपट्टी आकारल्याची अपीलकर्त्याची तक्रार होती. त्या अनुषंगाने सन १९९९ ते २०१० या काळातील घरपट्टीची माहिती त्यानी मागितली होती. विहित मुदतीत त्याना उत्तर दिले. घरपट्टी आकारणीचा तक्ता समजत नसल्याचे त्यानी सांगितल्यामुळे सविस्तर माहिती देण्याबरोबरच समजावूनही सांगितले. घरपट्टी कमी करण्याची त्यांची मागणी असून, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.चंद्रकांत भिवा चौधरी व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.नितीन कापडणीस यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मल्लीकार्जुन शिऱ्याप्पा कांबळे
मु.पो.बोर्गी बुद्रुक, ता.जत,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती जत,
ता.जत, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत बोर्गी बुद्रुक, ता.जत,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५७/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**<br>पंचायत समिती जत,<br>ता.जत, जि.सांगली श्री.दिलीपकुमार साहेबराव शिंदे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बोर्गी ग्रामपंचायतीच्या सन २००७-१० या कालावधीतील ग्रामसभा, ताळेबंद, करण्यात आलेली विविध कामे तद्नुषंगिक एकूण ६ मुद्दे | |

**विवेचन**

‘ मी मागणी केलेली माहिती मला मिळालेली आहे. त्याबाबत माझी काहीही तक्रार नाही, तरी माझे अपील निकाली काढण्यात यावे’, असे निवेदन अपीलकर्ता श्री.मल्लीकार्जून शिऱ्याप्पा कांबळे यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शंकर धानाप्पा कोंची
मु.पो.बिळूर, ता.जत.
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
प्राथमिक आरोग्य केंद्र येळवी,
ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९००/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**<br>प्राथमिक आरोग्य केंद्र, ढालगांव,<br>सांगली डॉ.प्रमोद मारुती कांबळे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**<br>जिल्हा परिषद, सांगली श्री.भालचंद्र कदम | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.४.११.२००८ च्या पत्रान्वये लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेल्या अहवालासंदर्भातील माहिती | |

## विवेचन

'जन माहिती अधिकाऱ्यांकडून मी मागणी केलेली माहिती मिळाली असून त्या संदर्भातील प्रलंबित देयकांची अदाई झालेली आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.शंकर धानाप्पा कोंची यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रघुनाथ सावळा जाधव
अनमोल, १३, कारंजकरनगर, **अपीलकर्ता**
विलासपुर गोडोलीचे दक्षिणेस-जुनी पारशी विहिर,
सातारा-४१५ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
सातारा विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३९४/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.रघुनाथ सावळा जाधव<br>अनमोल, १३, कारंजकरनगर,<br>विलासपुर गोडोलीचे दक्षिणेस-जुनी पारशी विहिर,<br>सातारा-४१५ ००१<br>**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**<br>सातारा विभाग सातारा श्री.एम.एस.डफळे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बोरगांव पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं. ४/२०१० संदर्भात घेतलेल्या जबाबाच्या नकला | |

**<u>विवेचन</u>**

'मागणीप्रमाणे जबाबाच्या नकला मिळाल्या असल्याने माझी काही तक्रार नाही. मी अपील मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.रघुनाथ सावळा जाधव यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दशरथ हरी जाधव
मु.पो.गव्हाण, ता.तासगांव, **अपीलकर्ता**
जि.सांगली-४१६ ४०८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय तासगांव,
जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय तासगांव,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७०/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसील कार्यालय तासगांव,<br>जि.सांगली श्री.रघुनाथ भगवान पोटे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.हरीभाऊ लक्ष्मण जाधव यांनी दि.३.१०.२००८ रोजी आणेवारी दुरुस्ती संदर्भात दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

## विवेचन

'अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय तासगांव, जि.सांगली यानी माझ्या अर्जाचा सहानभुतीपूर्वक विचार करुन कार्यवाही केली असल्याने माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.दशरथ हरी जाधव यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.किरण शांताराम भोसले
मु.जोगवाडी, पो.मावळी क.प, **अपीलकर्ता**
ता.बारामती, जि.पुणे-४१२ ००३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,**
पंचायत समिती बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** २ एच. पी. व ३ एच. पी. च्या कडबा कुटी च्या वाटपासंदर्भातील ३ मुद्दयांची माहिती | |

**विवेचन**

'अंशत: अनुदानावर वितरित करण्यात आलेल्या कडबा कुट्टी वाटपाची माहिती उपलब्ध करुन दिली असल्याने मी आपणाकडे केलेले अपील निकाली काढून टाकावे', असे अपीलकर्ता श्री.किरण शांताराम भोसले यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे दि.४.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. फत्तेसिंह नानासाहेब पाटील
इ-११/१२, मंत्री किशोर पार्क, अशोक नगर,
रेंजहिल रोड, पुणे ४११ ००७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार/पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२/२००९/पुणे + ७१९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. फत्तेसिंह नानासाहेब पाटील<br>इ-११/१२, मंत्री किशोर पार्क, अशोक नगर,<br>रेंजहिल रोड, पुणे ४११ ००७<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार/पुनर्वसन अधिकारी,<br>जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, जि. सातारा श्री. शंकर बाबुराव गोंजारी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमीन संपादन प्रक्रियेतील अर्जावरील कार्यवाहीबाबतचा अहवाल व कागदपत्रांच्या प्रती अशी माहिती मागितली होती. सन १९९८ मधील हा अर्ज असून याची प्रतही दिली. परंतु चुकीच्या पध्दतीने जमीन संपादन केल्यामुळे माझी जवळजवळ ७ एकर जमीन अकारण गेली आहे.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांचा माहिती-मागणीचा अर्ज संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग केला. त्यानी विचारणा केलेला अर्ज सन १९९८ मधील असून ते कायम स्वरुपी जतनाचे अभिलेख नाहीत. त्यामुळे तो उपलब्ध होत नाही. संबंधित जमीन संपादनाबाबतची माहिती अपीलकर्त्यास दिली. याच प्रकरणात त्यानी लोकायुक्तांकडे दाखल केलेल्या प्रकरणी अहवालही पाठविण्यात आला आहे. अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार जमिनीच्या दिशा बदलाबाबतची कार्यवाही आता करता येणार नाही. तसेही त्याना स्पष्ट केले आहे.

अपीलकर्त्यानी नमूद केलेल्या सन १९९८ मधील मूळ अर्जाच्या प्रती जन माहिती अधिकारी याना सादर कराव्यात व त्या वरील कार्यवाहीबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास पुरवावी. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरविंद लाटकर यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शास्तीबाबतच्या म्हणण्यासह ८ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार/पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, जि. सातारा श्री. शंकर बाबुराव गोंजारी यानी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरविंद लाटकर याना दि. २९.१०.२०१० च्या पत्रान्वये आयोगाचे आदेश कळविले. त्यानंतर आयोगाने दि. २५.५.२०११ व दि. ३०.५.२०११ रोजी दूरध्वनीवरुन स्मरण दिले. तरीही श्री. लाटकर यानी अद्याप अहवाल सादर केलेला नाही. ही बाब गंभीर आहे. अपीलकर्त्यांचा दि. २८.१२.२००८ चा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी दि. १६.१.२००९ रोजी अन्य कार्यालयाकडे माहितीसाठी वर्ग केला, असे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातील नोंदीवरुन व तत्कालीन जन माहिती अधिकारी अधिका-यांच्या अर्ज वर्ग करण्याच्या पत्रावरुन दिसून येते. आयोगाने स्मरण देऊनही श्री. लाटकर यानी अन्य तपशील सादर केलेला नाही. अहवाल सादर न करणे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ५ दिवसांच्या मुदतीत संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज वर्ग न करणे या बाबी लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरविंद लाटकर यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही करण्याबाबत गांभीर्याने दखल घेतलेली नाही. ते शास्तीस पात्र ठरतात.

लोकसभा निवडणुकीमुळे प्रथम अपिलाची सुनावणी घेता आली नाही. परंतु मूळ अर्ज उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास समक्ष सांगितले होते, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती नयना गुरव यानी नमूद केले आहे. मात्र अपिलाचा निर्णय लेखी स्वरुपात दिला जाणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्यांनी मूळ अर्जांच्या प्रती दिल्यानंतर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास कळविल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार/पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सातारा, जि. सातारा श्री. शंकर बाबुराव गोंजारी यानी दि.२८.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. जमीन वाटपात फेरबदल करण्याची या अर्जांमधील मागणी असून आता असा फेरबदल करता येणार नाही, असे लोकायुक्तांकडे दाखल केलेल्या अहवालात स्पष्ट केले असल्याचे त्यात म्हटले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अरविंद लाटकर (सध्या विशेष भूमि संपादन अधिकारी, बीड) यानी अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे ५ दिवसांत वर्ग करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बंधनकारक असतानाही १४ दिवस विलंबाने वर्ग केला. तसेच त्याबाबतचा कोणताही खुलासा/ अहवाल आयोगाने विहित केलेल्या मुदतीत व नंतरही सादर केलेला नाही. विलंब व शास्ती याबाबत त्याना काहीही म्हणावयाचे नाही असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे १४ दिवसांसाठी (१४ x २५०) ३,५००/- अशी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. अरविंद लाटकर यांच्या जून २०११ च्या जुलै २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मल्लाप्पा रामू औरसंगे
मु.पो.जत, ता.जत, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, पुणे,
राज्य परिवहन मंडळ, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक, विभागीय कर्मचारी
वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मंडळ, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मल्लाप्पा रामू औरसंगे
मु.पो.जत, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, पुणे,
राज्य परिवहन मंडळ, पुणे प्रतिनिधी श्री.संपतराव यशवंत पवार

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग नियंत्रक, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन मंडळ, सांगली श्री.संभाजी बाबूराव पाटील, श्री.राहूल अनंत तोटो (विभाग नियंत्रक )

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सहाय्यक वाहतूक निरीक्षक प्रवर्गाच्या खात्यांतर्गत बढती परीक्षेतील माझ्या उत्तरपत्रिकेची प्रत व अन्य माहिती मिळाली नाही. माझ्यावर अन्याय झाला असून माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : उत्तरपत्रिका देण्याबाबत मध्यवर्ती कार्यालयाकडे विचारणा केली असता 'देऊ नये' असे त्यानी कळविल्यामुळे तसे उत्तर अपीलकर्त्यास दिले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी ज्या परीक्षेबाबत माहितीची व स्वतःच्या उत्तरपत्रिकेची मागणी केली आहे ती सहाय्यक वाहतूक निरीक्षक पदाची खात्यांतर्गत बढतीची परीक्षा हा सार्वजनिक सेवेतील भाग आहे. शैक्षणिक स्वरूपाची ही परीक्षा नाही. जनतेच्या पैशातून, जनतेसाठी व जनतेमधून सार्वजनिक सेवक नेमण्याची / पदोन्नती देण्याची प्रक्रिया ही पारदर्शक असली पाहिजे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाचा तो एक अविभाज्य भाग आहे. म्हणून अपीलकर्त्यास दहा दिवसांत त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत व अनुषंगिक माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१४.५.२०११ च्या पत्रान्वये पूर्तता केल्याचे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, सांगली यानी आयोगास अवगत केले. उत्तरपत्रिका चुकीच्या पध्दतीने तपासली असल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.१९.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश भरमू कांबळे
१९/२९६, आंबेडकरनगर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, विशेष समाजकल्याण अधिकारी,
कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश भरमू कांबळे
१९/२९६, आंबेडकरनगर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, विशेष समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर
डॉ.बाजीराव पाटील

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, परिवर्तन मागास औद्योगिक संस्था मर्यादित, तिळवणी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.प्रमोद काशिनाथ कांबळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा स्टार मागास को-ऑप.इंडस्ट्रीयल सोसायटी लि., कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.जयकुमार श्रीरंग कांबळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मागासवर्गीयांसाठी शासनाने जमीन दिलेल्या दोन औद्योगिक सहकारी संस्थांच्या सभासदांचे निवासी पत्ते आदि माहिती मागितली होती. परंतु सभासदांचे पत्ते दिले नाहीत व संस्थांचे पत्ते संस्थांनी व समाजकल्याण अधिकाऱ्यानी वेगवेगळे दिले आहेत. सभासदाना वार्षिक सभाना हजर राहता येऊ नये म्हणून असे केले जात असून वार्षिक सभा घेण्यात आलेल्या नाहीत. अनुसूचित जाती-जमातींचा परराज्यातील दाखला धारण करणारे सभासद एका संस्थेत आहेत. हा स्थानिक लोकांवर अन्याय आहे. त्याबाबतचा खुलासा दिला जात नाही.

जन माहिती अधिकारी : आमच्याकडे उपलब्ध असलेली ३५० पानी अहवालाच्या प्रतींसह सर्व माहिती निःशुल्क दिली. आणखीही माहिती हवी असल्यास अभिलेखानुसार देता येईल. मात्र सभासदांचे निवासी पत्ते देता येणार नाहीत. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहितीची मागणी अपीलकर्त्यानी नंतरच्या पत्रव्यवहारात व अपिलात केली आहे.

अपिलीय प्राधिकारी : संबंधित औद्योगिक संस्थांवर उपनिबंधक, सहाकारी संस्था यांचे नियंत्रण असते. अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी प्रशासकीय कार्यवाहीविषयक आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. सभासदांचे निवासी पत्ते खाजगी बाब आहे. त्यामुळे ते न देण्याचा जन माहिती अधिकाऱ्याचा निर्णय योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती

योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील. त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीमंधर धनपाल सोळांकुरे
मु. पो. नागाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. श्रीमंधर धनपाल सोळांकुरे
मु. पो. नागाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय,
जि. कोल्हापूर श्रीमती वैशाली राजमाने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u>- सन १९९६ ते २००९ या काळातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांची कोल्हापूरच्या बेलबाग भागातील यादी मागितली होती, ती मिळाली नाही. अभिलेखाचे अवलोकन करण्यास जन माहिती अधिकारी यानी कळविले. माझ्या मावशीला सन १९९६ पर्यंत या योजनेत निवृत्ती वेतन मिळत होते. तिचे नाव सध्याच्या यादीत नाही. त्याबाबतचे स्पष्टीकरण मिळाले नाही. ते समाविष्ट करण्याची मागणी आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u>- अपीलकर्त्यांच्या दि. ६.३.२०१० च्या अर्जाला दि. १५.३.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. शहराच्या विशिष्ट विभागातील अशी यादी देणे शक्य नसल्यामुळे योजनेतील सर्व रजिस्टर्स दाखविण्याची व अपीलकर्त्यास हव्या असल्यास ७९५० पृष्ठांची माहिती देण्याची तयारी असल्याचे शुल्कासह कळविले. त्यांच्या मावशीसाठी नव्याने खाते उघडण्याकरिता नमुना अर्ज व ३ छायाचित्रे घेऊन हजर राहण्यास कळविले होते. त्यानुसार त्या न आल्यामुळे खाते बंद झालेले आहे.

अपीलकर्त्यांना माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. कोल्हापूर श्रीमती वैशाली राजमाने व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री. अजित रेळेकर यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. लालचंद आनंदराम नागदेव
ताराबाई पार्क, कोल्हापूर-३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा असिस्टंट मॅनेजर,
दि रवी को. ऑप. बँक लि. कोल्हापूर,
१२४९, सी वॉर्ड, रविवार पेठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१७/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी डॉ. अर्चना रा. आटपलवार

**जन माहिती अधिकारी** तथा असिस्टंट मॅनेजर,
दि रवी को. ऑप. बँक लि. कोल्हापूर,
१२४९, सी वॉर्ड, रविवार पेठ, कोल्हापूर श्री. राजेंद्र हरिभाऊ पायमल

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता डॉ. लालचंद आनंदराम नागदेव यानी चार अर्जांन्वये दि रवी को. ऑप. बँक लि. कोल्हापूर, यांचेकडे माहिती मागितली होती. बँकेवर अवसायक असून डॉ. नागदेव याना त्यांच्या मागणीनुसार सर्व माहिती देण्यात आली. ते व त्यांचे कुटुंबीय यांची ठेवीची रक्कम परत मिळण्याची त्यांची मुख्य मागणी होती. ही रक्कम परत करण्यात आली आहे. त्याबाबतचा तपशीलही त्याना दिला आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक श्री. राजेंद्र हरिभाऊ पायमल यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमर विश्वासराव इंगळे
व्दारा विजय आर्केड, दलाजीराव इंगळेनगर,
पेट्रोल पंपाशेजारी, कागल, पो. ता. कागल, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमि अभिलेख,
कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, कागल, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अमर विश्वासराव इंगळे
व्दारा विजय आर्केड, दलाजीराव इंगळेनगर,
पेट्रोल पंपाशेजारी, कागल, पो. ता. कागल, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमि अभिलेख,
कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. सुधीर दे. अलगौडर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, कागल, कोल्हापूर श्री. गणेश सूर्यकांत यंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमीन मोजणी व कब्जेपट्टी प्रकरणातील माहिती दोन अर्जांद्वारे मागितली होती. दोन अर्जांमध्ये गफलत झाली व एका अर्जातील ७ मुद्दयांची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या अर्जाच्या काळात मी रजेवर होतो. तथापि तत्कालीन अधिकाऱ्यांनी माहिती दिल्याची पोहच दप्तरी आहे. मागणी प्रमाणे नकला मिळाल्या असल्याने अर्ज निकाली ठेवणेस हरकत नाही. असे त्यानी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, कागल यांच्याकडे केलेल्या अर्जावर लिहून दिले आहे.

अपीलकर्ता श्री. अमर विश्वासराव इंगळे यानी सादर केलेली अर्जाची प्रत व जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी असलेल्या अर्जाची प्रत पाहता अपीलकर्त्यांनी अर्जाच्या प्रथम पृष्ठाची प्रत दिली असून दुसरे पान जन माहिती अधिकाऱ्यांना मिळालेले नाही असे दिसून येते. हे लक्षात घेता अपीलकर्त्यांनी संपूर्ण अर्जाची/दुसऱ्या पानाची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांना द्यावी व ती दिल्यापासून एक आठवडयात जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, कागल, कोल्हापूर श्री. गणेश सूर्यकांत यंदे यानी देय माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दीपक आ. उंडाळे
३३८/अ-४, ई वॉर्ड, रेल्वे स्टेशनसमोर,
स्टेशनरोड, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. दीपक आ. उंडाळे<br>३३८/अ-४, ई वॉर्ड, रेल्वे स्टेशनसमोर, स्टेशनरोड, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. सुधीर दे. अलगौडर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमि अभिलेख, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. सुरेश शिवमुर्ती रेड्डी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -जमीन मोजणीच्या संदर्भातील व मोजणीचा नकाशा तयार करण्याच्या प्रक्रियेबाबतची, तसेच एका प्रकरणातील नकाशा केव्हा व कोठे तयार झाला याची माहिती मागितली होती. नकाशाची प्रक्रिया कार्यालयात बसून केली जात असल्यामुळे संबंधित प्रकरणी घडलेला गुन्हा त्या कार्यालयात घडल्याचे मानून त्या तालुक्यात गुन्हा दाखल करावा. अशी मागणी आहे.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांनी दि. १५.२.२०१० च्या अर्जान्वये नियमावली व अनुषंगिक माहिती मागितली होती. दि. २६.२.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. नकाशा हा मोजणीच्या ठिकाणीच तयार होतो. तसे उत्तर प्रक्रियेबाबतच्या त्यांच्या विचारणेवर दिले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. जमिनीची मोजणी, नकाशा तयार करणे इ. संदर्भातील नियमावलीची प्रत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. सुरेश शिवमुर्ती रेड्डी यानी पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमित रघुनाथ कांबळे
मु. भाटणवाडी, पा. हसूर दुमाला,
ता. करवीर, जि. कोल्हापूर ४१६ २११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
प्राथमिक शिक्षणमंडळ, महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
प्राथमिक शिक्षणमंडळ, महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ए. आर. पोतदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अमित रघुनाथ कांबळे यानी मागितलेली माहिती सीबीएसई बोर्डाच्या संदर्भातील आहे. हे 'सार्वजनिक प्राधिकरण' आमच्या कक्षेतील नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ, महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ए. आर. पोतदार व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. सूर्यकांत पाटील यांनी केले. ते रास्त आहे. तथापि अपीलकर्त्यास तसे निःसंदिग्धपणे कळविले जाणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन नारायण कुंभार
कुंभार गल्ली, नंदीवेस, गडहिंग्लज्
ता. गडहिंग्लज्, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरिक्षक,
भूमि अभिलेख, गडहिंग्लज् ता. गडहिंग्लज्, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गजानन नारायण कुंभार
कुंभार गल्ली, नंदीवेस, गडहिंग्लज्, ता. गडहिंग्लज्, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरिक्षक,
भूमि अभिलेख, गडहिंग्लज् ता. गडहिंग्लज्,
जि. कोल्हापूर श्री. सुधीर दे. अलगौडर

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, कोल्हापूर श्री. रविंद्र नारायण पिसे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. नितीन मारुती साळुंखे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नोव्हेंबर १९८६ मधील मिळकत पत्रिकेवरील नोंदीबाबतचा अर्ज, जबाब, नोटिसा इ. कागदपत्रांच्या प्रती न्यायालयीन कामासाठी हव्या आहेत. परंतु धारिका अढळ होत नसल्यामुळे नकला देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले.

जन माहिती अधिकारी- कसून शोध घेऊनही संबंधित धारिका आढळली नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास तसे विहित मुदतीत कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीनुसार ती उपलब्ध होणे आवश्यक आहे की नाही, हे अपिलीय प्राधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, गडहिंग्लज् ता. गडहिंग्लज्, जि. कोल्हापूर श्री. जयंत व. निकम यानी तपासावे व त्यानुसार आयोगास अहवाल सादर करावा, त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी. जतनाच्या कालावधीनुसार उपलब्ध होणे आवश्यक असलेले अभिलेख अढळ होत नसल्यास अपिलीय प्राधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, गडहिंग्लज् ता. गडहिंग्लज्, जि. कोल्हापूर श्री. जयंत व. निकम यानी संबंधित कर्मचा-यांवर/अधिका-यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये कारवाई करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संतोष दशरथ साळुंखे
मु. पो. देगाव, ता. व जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
देगाव विकास सेवा संस्था, ता. व जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
देगाव विकास सेवा संस्था, ता. व जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. संतोष दशरथ साळुंखे
मु. पो. देगाव, ता. व जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
देगाव विकास सेवा संस्था, ता. व जि. सातारा श्री. विजयसिंह रामचंद्र घाडगे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
देगाव विकास सेवा संस्था, ता. व जि. सातारा श्री. दिपक विनायक राजे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - देगाव विकास सेवा सोसायटी या संस्थेचा मी सभासद असून मागितलेली माहिती दिली जात नाही. संस्थेला शासनाकडून अनुदान वा अन्य अर्थसहाय्य मिळत नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्ता यानी मागणी केली तेव्हा संस्थेवर प्रशासक नियुक्त होते. तसेच मागितलेली माहिती अन्य सभासदांच्या आर्थिक व्यवहाराशी निगडित होती. संस्थेला कोणतेही शासकीय अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही निवडणुकीच्या वादातून वारंवार अर्ज करुन अपीलकर्ता त्रास देतात, शिवीगाळ करतात. त्यांच्या विरुध्द पोलिस ठाण्यात फिर्यादही नोंदविली आहे.

अपिलीय प्राधिकारी - संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान वा अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) अन्वये ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तसे उत्तर दिले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २७ मे २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिनेश दत्तात्रय कदम
२१८, शुक्रवार पेठ, शिंदे वाडा,
अकरा मारुती कोपरा,
पुणे-४११ ००२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
विभागीय कार्यालय क्र.२,
कै.बा.स.ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
विद्युत विभाग, कै.बा.स.ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८६०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.दिनेश दत्तात्रय कदम<br>२१८, शुक्रवार पेठ, शिंदे वाडा,<br>अकरा मारुती कोपरा, पुणे-४११ ००२<br><br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>विद्युत विभाग, कै.बा.स.ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.श्रीकृष्ण सदाशिव चौधरी | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयासाठी उप अभियंता (विद्युत), या पदावर सुरुवातीपासून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचा तपशील | |

**<u>विवेचन</u>**

'मी मागणी केल्याप्रमाणे मला माहिती मिळाली असल्याने माझा अपील अर्ज रद्द करण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री. श्री.दिनेश दत्तात्रय कदम यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.वसंत अर्जुन नारायणकर
मु.पो.मार्डी, ता.उत्तर सोलापूर, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्र.कार्यकारी अभियंता,**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
जिल्हा परिषद, बांधकाम विभाग-१,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६३/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.वसंत अर्जुन नारायणकर<br>मु.पो.मार्डी, ता.उत्तर सोलापूर,<br>जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**<br>जिल्हा परिषद, बांधकाम विभाग-१,<br>सोलापूर श्री.किसन ज्ञानदेव घाडगे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा प्र.कार्यकारी अभियंता,**<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.रावसाहेब सदाशिवराव बोबडे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सोलापूर-मार्डी रस्त्यावरील श्री यमाईदेवी मंदिर ते पर्णकुटी पर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाशी संबंधित कागदपत्रे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.वसंत अर्जुन नारायणकर यानी याच विषयाबाबतच्या दि.१७.७.२००८च्या च्या माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे दोन स्वतंत्र अपिले केली आहेत. श्री.नारायणकर यांच्या यापैकी एका अपिलावर (अपील क्र.७८०/२००९/सोलापूर) दि.३१.३.२०११ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत, तेच आदेश प्रस्तुत अपिलात- देखील लागू होतात.

एकाच माहिती-मागणी अर्जासाठी आयोगाकडे दोन वेगवेगळी अपिले करुन आयोगासह सर्व यंत्रणांचा वेळ वाया घालविल्याबद्दल अपीलकर्ता श्री.नारायणकर याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ मे २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**ज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुखदेव बापू पवार
मु.पो.आलेगाव, ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३८ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कालबध्द पदोन्नती व नियमबाहय वेतनवाढ रोखण्याबाबत शिक्षण उपसंचालकांकडे केलेल्या अर्जांवर चौकशी करुन अहवाल मिळावा अशी मागणी आहे. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुखदेव बापू पवार यानी केली.

आपण नव्याने रुजू झालो असून तत्कालीन अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती घेत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यानी सांगितले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय

प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी १० दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे यानी दि.२१.५.२०११ च्या पत्रान्वये अहवाला सादर केला. श्री. पवार यांच्या मागणीनुसार चौकशी करुन अहवाल विहित मुदतीत देण्यात आला व प्रशालेने श्री. पवार याना कालबध्द पदोन्नती व नियमित वेतनवाढ न दिल्याबद्दल मुख्याध्यापकांचे वेतन तहकूब केले आहे. हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात दाखल असून माहितीबाबत आपण समाधानी असल्याचे श्री. पवार यानी लेखी दिले आहे, असे श्री. पवार यांच्या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी यानी खुलाशात नमूद केले आहे. सदर खुलासा मान्य करण्यात येत आहे. मात्र आयोगाने विहित केलेल्या मुदतीत खुलासा सादर करणे आवश्यक असून यापुढे त्यानुसार पुर्तता न झाल्यास कारवाई करण्यात येईल, अशी समज जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जे.टी.खंडागळे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर सोपान करचे
मु. पो. सोमंथळी, ता. फलटण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी/अवर सचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर सोपान करचे
मु. पो. सोमंथळी, ता. फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. भि. रा. वाढवे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी/अवर सचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. रा. सा. खोमणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पोलिस उप निरीक्षकाविरुध्द खाजगी फौजदारी खटला भरण्यासाठी मागितलेल्या मंजुरीचे पत्र मिळाले नाही. दोन वर्षे होऊनही मंजुरी न मिळाल्यामुळे मागितलेली माहितीही मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांनी केलेला अर्ज पोलिस महासंचालकांकडे पाठविला. अशा खटल्याच्या संदर्भातील कायदेशीर तरतुदीची माहितीही दिली. अपीलकर्त्यांचा खटल्याचा संदर्भ वैयक्तिक स्वरुपाचा आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून त्यांच्या मागणीनुसार खटला भरण्यास मंजुरी मिळणे-न मिळणे आदीबाबतच्या त्यांच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र माहिती-मागणीचा अर्ज वर्ग करणे, उत्तर देणे इ. बाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित मुदतीनुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी/अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. रा. सा. खोमणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. भि. रा. वाढवे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. किसन गणपत चिकणे
रा. कुसुंबी, ता. जावली, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय जावली (मेढा), ता. जावली, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय जावली (मेढा), ता. जावली, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. किसन गणपत चिकणे
रा. कुसुंबी, ता. जावली, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय जावली (मेढा),
ता. जावली, जि. सातारा श्री. एन. एल. कुंभारे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय जावली (मेढा),
ता. जावली, जि. सातारा श्री. एस. ए. घोलप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

त्रयस्थ व्यक्तीच्या उत्पन्नाच्या दाखल्याची माहिती अपीलकर्ता श्री. किसन गणपत चिकणे यानी मागितली होती. तसा दाखला मिळाला नाही, अशी तक्रार त्यानी केली. मात्र मागणी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील असून उत्पन्नाचा दाखला देणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० मे २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जयराज कोरण वेल्लायन
प्लॉट नं.२३, वैभव को-ऑप.हौसिंग सोसायटी, शाहू नाक्याचेजवळ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर,
पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
सोन्या मारूती चौक, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११९ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.५.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.जयराज कोरण वेल्लायन<br>प्लॉट नं.२३, वैभव को-ऑप.हौसिंग सोसायटी, शाहू नाक्याचेजवळ, कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,<br>सोन्या मारूती चौक, कोल्हापूर श्री.महेश जी.सावंत | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : भाडेकरू म्हणून आपच्याकडे असलेल्या खोल्यांचा कब्जा बेकायदेशीररीत्या घेण्याचा प्रयत्न मालकाने केल्याविरूध्द आम्ही केलेल्या फिर्यादीचा तपास पोलिसांनी योग्य प्रकारे केला नाही. त्याबाबतचा कायदेशीर अभिप्राय मागितला असता दिला जात नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याची विचारणा तपासाविषयीच्या कायदेशीर बाबींचा खुलासा, अन्वयार्थ आदिंची मागणी करणारी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मधील 'माहिती'च्या संज्ञेत अशी विचारणा येत नाही, असे त्याना जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कळविले व अपिलीय प्राधिकाऱ्यानीही तो निर्णय कायम केला.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय मारुती बुबणे
शाहूगर, महानगरपालिका शाळा नं. ९ जवळ, अपीलकर्ता
सुदर्शन चौक, श्री. देशपांडे यांचे घरी, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०८७/२०१०/कोल्हापूर + १२९१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय मारुती बुबणे
शाहूगर, महानगरपालिका शाळा नं. ९ जवळ,
सुदर्शन चौक, श्री. देशपांडे यांचे घरी, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली श्री. पांडुरंग गणपती साठे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
जिल्हा परिषद, सांगली श्री. शिवाजी शंकर कांबळे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सेवानिवृत्त सहशिक्षक श्री. सूर्यकांत संभाजी चव्हाण याना दिलेली भविष्य निर्वाह निधीची जादा व्याजाची रक्कम रु. १२,२९६/- व सुट्टीतील वाहन भत्त्याची रक्कम रु. ४,५९२/- ही १२ टक्के चक्रवाढ व्याजाप्रमाणे वसूल करावी व व्याजाचे कमी काढलेल्या रक्कमेचे चलन द्यावे, दोन्ही अपिले एकाच मागणीची असून माहिती दिली जात नाही. पदस्थापनेबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडून आदेश घ्यावयाचे असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी- श्री. चव्हाण सेवानिवृत्त झाले असून त्याना दिलेल्या रकमांबाबत शासनाला योग्य तो खुलासा केला आहे. त्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आल्या आहेत. अपीलकर्ता हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली कार्यालयात वरिष्ठ लिपिक असून दि. ८.१०.२००७ पासून त्याना निलंबित करण्यात आले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली त्यांच्याविरुध्द न्यायालयात दावा दाखल आहे. पदस्थापनेबाबत ते वारंवार मागणी करीत असतात. त्या संदर्भातील पत्रव्यवहाराच्या प्रतीही त्याना दिल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यांची रक्कम वसुलीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग नथुराम खारकांडे
मु. पो. ता. पलुस, जि. सांगली                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
नगरपालिका इमारत, संयुक्त विभाग, विटा, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग किर्लोस्करवाडी, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३९/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पांडुरंग नथुराम खारकांडे
मु. पो. ता. पलुस, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
नगरपालिका इमारत, संयुक्त विभाग, विटा,
जि. सांगली श्री.अविनाश आर.पाटील

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग किर्लोस्करवाडी, जि. सांगली श्री. भारत पांडुरंग वनमाने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विजेची बिले रीतसर भरलेली असतानाही माझ्या घराचा व दुकानाचा वीज पुरवठा अचानकपणे तोडला. वीजचोरीच्या जोडणीमुळे मीटर बंद केला. त्याबाबतचे कारण कळले पाहिजे व नुकसान भरपाई मिळावी. विनाकारण दिलेली आठ बिले तपासून त्याची सत्यासत्यता पडताळून माहिती मिळावी. वीज तोडल्यानंतरही ४ बिले वीज मंडळाने पाठविली असून ती रक्कम भरण्यास सांगितले जात आहे.

जन माहिती अधिकारी- ऑक्टोबर २००७ मध्ये अपीलकर्त्यांनी मीटर तपासणीचा अर्ज केला होता. तो उपलब्ध होत नाही. थकबाकीमुळे त्यांचा वीज पुरवठा बंद केला. ते वीज चोरी करत असल्यामुळे गुन्हा दाखल केला. त्यानंतर त्यानी बिलाचे पैसे भरल्यावर त्यानंतर वीज पुरवठा चालू केला. त्यानंतर चुकीची बिले दिली गेली आहेत, ती दुरुस्त करुन देत असल्याचेही अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे. तरीही अपीलकर्ता सातत्याने तीच माहिती वेगवेगळया पध्दतीने वारंवार मागत असून जून २००९ ते सप्टेंबर २०१० या कालावधीत याच विषयात त्यानी एकूण १४ अर्ज केले आहेत.

अपीलकर्त्यांच्या १४ अर्जांचा तपशील जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग किर्लोस्करवाडी, जि. सांगली श्री. भारत पांडुरंग वनमाने यानी लेखी स्वरुपात सादर केला.

अपीलकर्त्यांची तक्रार व मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच एकच मागणीसाठी सातत्याने माहितीच्या अधिकारात अर्ज/अपिले करणे हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही. तथापि अपीलकर्त्याचे विजमीटर बंद करणे व संदर्भित वीज बिलांबाबत केलेली कार्यवाही याची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य

वीज वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग किर्लोस्करवाडी, जि. सांगली श्री. भारत पांडुरंग वनमाने यानी अपीलकर्त्यास पाच दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, पाठीमागची बाजू, डी-वॉर्ड,
घर नं.२६४६, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक
कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस अधीक्षक
कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, पाठीमागची बाजू, डी-वॉर्ड, घर नं.२६४६, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक
कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.परशुराम झंम्पुना देमजी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस अधीक्षक
कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर श्री.परशुराम झंम्पुना देमजी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता : पो</u>लीस अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यपध्दतीसंदर्भातील माहिती पूर्ण व मुदतीत मिळाली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीनंतर शुल्क भरून घेऊन काही माहिती दिली. संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी.

<u>जन माहिती अधिकारी</u> : श्री.कापसे यांच्या दि.५.१.२००९ च्या अर्जाला दि.४.२.२००९ च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. दि.१०.२.२००९ रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर माहिती दिली. विशिष्ट नमुन्यात माहिती द्यावी अशी त्यांची अपेक्षा असून नियमावली, आगामी कार्यवाही अशा स्वरूपाची विचारणा त्यानी केली आहे. तरीही मुद्देनिहाय उत्तर दिले. मूळ अर्जात नसलेली मागणी त्यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान केली. तीही माहिती नंतर दिली. एकूण तीन वेळा माहिती समक्ष दिली व टपालानेही पाठविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जात अनेक मुद्दे (उदा.मु.क्र.४, ६, ११ ) ढोबळ स्वरूपाचे, कोणताही नेमकेपणा नसलेले व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत न येणारे असे आहेत. 'वाहतूक शाखेमध्ये नियम नियमावलीची यादी मिळावी व सविस्तर आपल्या विभागाची माहिती मिळावी, म्हणजे लोकांना आपणास सहकार्य करण्यासाठी मदत होईल व तरी आपणाकडून आम्हास सहकार्य मिळेल का व शासनाचे जी.आर.नियम मिळतील का,'अशा स्वरूपाची विचारणा ही 'माहिती' ठरत नाही. आगामी कार्यवाही हा अभिलेखात असलेल्या माहितीचा भाग नाही. तसेच सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावली ही जन माहिती अधिकाऱ्यांच्या कक्षेत असलेली माहिती मानता येणार नाही. त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. अशा नियमावलीची मागणीही अपीलकर्त्याने नेमकेपणाने व सुस्पष्टरीत्या केलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये 'माहिती' म्हणजे काय, हे स्पष्ट केले आहे. अपीलकर्त्यानी त्यानुसारच माहिती मागणे आवश्यक आहे, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेशराव संपतराव शिंदे
मु.पो.भुईंज, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेशराव संपतराव शिंदे
मु.पो.भुईंज, ता.वाई, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, सातारा श्री.टी.डी.चिंदके

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, सातारा श्री.डी.एस.पोळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : लघुपाटबंधारे अंतर्गत शासनाच्या सर्व योजनांमधील सन २००१ ते २०१० या कालावधीतील या विभागातील सर्व योजनांची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे मागितली होती. सुमारे आठ ते दहा हजार शुल्क भरूनही सर्व माहिती मिळाली नाही. माहिती तपासल्यावर ती अपुरी असल्याचे व मागितलेल्या माहितीचे प्रमाण लक्षात घेता एवढी कमी पृष्ठे असू शकत नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी अनेक विभागांशी संबंधित अशी दहा वर्षांच्या कालावधीतील व सरसकट स्वरूपाची माहिती मागितली होती. संबंधित विभागांकडे त्यांचा अर्ज वर्ग केला. पाच जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत त्याना शुल्कही कळविले. परंतु अपीलकर्त्यांनी ते भरले नाही. सर्व माहिती आम्हीच एकत्र करून द्यावी, अशी त्यांची मागणी होती. माहिती संकलित करण्यास विलंब लागेल, हेही त्याना कळविण्यात आले होते. अपीलकर्त्यानी प्रथम अपीलही त्या त्या विभागाच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे करणे अपेक्षित असताना तसे केले नाही व सर्व जन माहिती अधिकाऱ्यांना एकत्र बोलावून सुनावणी घेतली असता उपविभागांकडून माहिती घेण्यास त्यानी नकार दिला. त्यामुळे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यांना शुल्क आकारून एकत्रित माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी : माहिती संकलित करून देणे बंधनकारक नसतानाही दिली आहे. सरसकट माहिती न मागता नेमकेपणाने विशिष्ट योजनांबाबतची माहिती मागितल्यास देता येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती ढोबळ मानाने व सरसकटपणे मागितली आहे. अशा प्रकारची मागणी व अनेक विभागांकडून माहिती न घेता एकाच ठिकाणी ती संकलित करून देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये योग्य नाही. जन माहिती अधिकाऱ्यांवर ते बधंनकारक नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित कार्यालयांच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती मागावी अथवा अर्ज वर्ग केल्यानंतर त्या त्या जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क भरून किंवा अभिलेखांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. एकाहून अधिक कार्यालयांकडे अर्ज

वर्ग करणेही जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नसल्याचे शासनाने दि.६ सप्टेंबर २००८ च्या (क्र.केंमाअ-२००८/ प्र.क्र.९३/०८/सहा(मा.अ.) परिपत्रकान्वये स्पष्ट केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महंमद बाबालाल मुल्ला
३८,लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.
सातारा ४१५ ००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १
जुनी पी.एम.टी.बिल्डिंग, दुसरा मजला,
जानकी हॉलच्या पाठीमागे, स्वारगेट, पुणे - ३७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव व संशोधन अधिकारी,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १
जुनी पी.एम.टी.बिल्डिंग, दुसरा मजला,
जानकी हॉलच्या पाठीमागे, स्वारगेट, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १
जुनी पी.एम.टी.बिल्डिंग, दुसरा मजला,
जानकी हॉलच्या पाठीमागे, स्वारगेट, पुणे श्री. डी. पी. वाकोडे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव व संशोधन अधिकारी,<br>जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १<br>जुनी पी.एम.टी.बिल्डिंग, दुसरा मजला,<br>जानकी हॉलच्या पाठीमागे, स्वारगेट, पुणे श्री. दिपक रावसाहेब वडकुते |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. महंमद बाबालाल मुल्ला यानी तीन व्यक्तींच्या जातवैधता प्रमाणपत्रासाठी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. त्या न मिळाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी त्यानी आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता श्री. महंमद बाबालाल मुल्ला यानी त्रयस्थ व्यक्तींसंदर्भातील माहिती मागितली असून संबंधित संचिका शोध घेऊनही आढळल्या नाहीत. त्यामुळे तसे कळविले. मात्र अशा प्रकारे अन्य व्यक्तींच्या व अन्य प्रकरणांच्या संदर्भातील माहिती मागणारे अनेक अर्ज अपीलकर्ता सातत्याने करीत असतात. तृटी असलेली व सखोल चौकशी आवश्यक असलेली प्रकरणे अवैधरीत्या निकालात काढून घेण्यासाठी अपीलकर्ता दबावाचा भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर करीत असतात. माहितीच्या अधिकाराचा गैर फायदा घेऊन त्याना हव्या असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रस्तावासंबंधी नियमबाहयरीत्या समितीवर माहिती-अधिकाराच्या अर्जाचा दबाव आणून तसे करण्यास ते भाग पाडतात.
आपला हेतू साध्य होताच माहिती मिळाल्याची पोहोच ते देतात. अशा स्वरुपाचे काही अर्ज अन्य व्यक्तींच्या नावे असले तरी त्या अर्जांचा पाठपुरावाही श्री. महंम्मद बाबालाल मुल्ला हेच करीत असतात. समितीकडील कामाचे प्रमाण, अपुरा कर्मचारी वर्ग व कामाची निकड लक्षात घेता श्री. मुल्ला सातत्याने अशा प्रकारे त्रास देत आहेत.

अशाच आशयाचे लेखी निवेदन, श्री. मुल्ला यांचे अर्ज व त्यानी केलेली विविध व्यक्तींच्या जात पडताळणी संबंधीच्या माहितीची मागणी याच्या तपशिलासह जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव व संशोधन अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, स्वारगेट, पुणे श्री. दिपक रावसाहेब वडकुते यानी सादर केले. ते पाहता अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा अयोग्य वापर करीत असल्याचे स्पष्ट होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या मूलभूत तत्त्वाशी ते विसंगत व मारक आहे. मात्र त्यांच्या अर्जांच्या दबावापोटी प्रस्ताव अवैधरीत्या मार्गी लावले जातात, असे जन माहिती अधिकारी तथा सदस्य

सचिव व संशोधन अधिकारी, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १ स्वारगेट, पुणे श्री. दिपक रावसाहेब वडकुते व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, स्वारगेट, पुणे श्री. डी. पी. वाकोडे यांच्या निवेदनातून दिसून येते. ते योग्य नाही. अपीलकर्ता दबाव आणत असल्यास त्यांच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे. तसेच त्रयस्थ व्यक्तींच्या जात पडताळणीसंबंधीची माहिती व कागदपत्रे अन्य कोणीही माहितीच्या अधिकारात मागितल्यास तसेच सबळ कारण असल्याशिवाय अवलोकनासाठीही देता कामा नयेत, याची समज जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नागनाथ रानबा मस्के
२८०/१, आंबेडकरनगर, दक्षिण सदर बझार, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक
बालविकास प्रकल्प, पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८९१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागनाथ रानबा मस्के
२८०/१, आंबेडकरनगर, दक्षिण सदर बझार, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनीषा देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.जी.पी.अकेले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : एप्रिल २००७ ते जुलै २०१० या काळातील मोहोळ प्रकल्पातील पूरक पोषण आहार बचत गटाला दिलेल्या रकमा आदिंबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. सर्व अंगणवाड्यांकडून माहिती गोळा करुन शुल्क कळविण्यास दोन दिवस विलंब झाला. सुमारे ९,५५,२०६ रुपये एवढा खर्च येत असल्याचे कळविले. त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांची संख्या यावरुन लक्षात येईल. अभिलेख अवलोकनासाठीही बोलाविले. परंतु चर्चेला आल्यानंतर माहितीऐवजी विविध स्वरुपाचे मुद्दे उपस्थित करुन एका कर्मचाऱ्याचे निलंबन रद्द करावे, बदली रद्द करावी, अशासारख्या मागण्या त्यानी केल्या. तसेच पैशाचीही त्याना अपेक्षा आहे. माहितीच्या अधिकाराचा वापर करुन दबाव आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अन्य एका अपिलातील अपीलकर्ते श्री.बसवराज शिवप्पा पाटील यानीही हीच माहिती मागितली असून विशिष्ट उद्देशाने असे अर्ज केले जात आहेत.

अपिलीय प्राधिकारी : सीडीमध्ये माहिती संकलित करून देण्याचे आदेश दिले. परंतु 'सीडी नको, हस्तलिखित माहितीच पाहिजे,'असा आग्रह अपीलकर्त्यानी धरला. माहितीपेक्षा निलंबन रद्द करणे, बदली रद्द करणे, अशा स्वरूपाच्या त्यांच्या मागण्या आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या या निवेदनावर अपीलकर्ता यानी, 'अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांच्या संदर्भात संघटनात्मक पातळीवरील मागण्यांची चर्चा आपण केली,' असे प्रतिपादन केले. मात्र अशा स्वरूपाची चर्चा व कार्यपध्दती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शी संबंधित नाही व या कायद्यान्वये ते अपेक्षितही नाही. म्हणून माहितीच्या अधिकाराच्या व या अधिनियमाच्या मूळ उद्दिष्टाशी सुसंगत असाच त्याचा वापर करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. अत्यंत व्यापक स्वरूपाची माहिती विविध पातळ्यांवरून संकलित करून देण्याची व तीही नि:शुल्क मिळण्याची अपीलकर्त्याची मागणी योग्य नाही. आवश्यक असल्यास शुल्क भरून सर्व, अथवा अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून अपीलकर्ता प्राप्त करून घेऊ

शकतात. अपीलकर्त्यांच्या अन्य स्वरूपाच्या मागण्यांबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची तक्रार गंभीर स्वरूपाची असली, तरी त्याबाबत रीतसर कायदेशीर कार्यवाही करण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० मे २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शरणप्पा चंद्रामप्पा हेगडे
सदानंदनगर, वासूद रोड, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी
शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, सांगोला तालुका शेतकरी
शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर प्रतिनिधी डॉ.साहेबराव भिमराव जुंदळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शरणप्पा चंद्रामप्पा हेगडे हे सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर या संस्थेच्या सेवेत होते. गैरवर्तनाच्या संदर्भात त्यांची चौकशीही करण्यात आली. विविध प्रकारचे आरोप करून कारणे, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा ते माहितीच्या अधिकारात वारंवार करीत असतात, अशा स्वरूपाची विचारणा करणारे / माहिती मागणारे आठ अर्ज त्यानी केले असून पुनः पुन्हा तीच माहिती मागूनही वेळोवेळी उत्तर दिले आहे. श्री.विलास यशवंत बगले नावाच्या एका मोटरसायकल मेकॅनिकचा पत्ता, शिधापत्रिकेची प्रत यांचा वापर करून त्यांची फसवणुकीने सही घेतली.

त्याबद्दल पोलिसांकडे तक्रार नोंदविल्यानंतर तसा जबाब श्री.बगले यानी दिला आहे. अपीलकर्त्यांना माहितीपेक्षा संस्थेला त्रास देण्याचा उद्देश आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी प्राचार्य डॉ.साहेबराव भिमराव जुंदळे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

पोलिसांकडे केलेली तक्रार व संबंधित जबाब याच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा यानी माहितीच्या अधिकारात प्राप्त करून घेऊन आयोगाला सादर कराव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.विठ्ठलराव सखाराम शिंदे यानी दि.२८.५.२०११ च्या पत्रान्वये श्री.बगले यांच्या जबाबाच्या प्रतीसह कागदपत्रांच्या प्रती आयोगाला सादर केल्या. ही सर्व कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा अयोग्य वापर करीत असून अन्य व्यक्तीच्या नावाचा / दारिद्र्यरेषेखालील दाखल्याचा गैरवापर करीत असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या मूळ उद्दिष्टाशी विसंगत व या कायद्याबद्दल जनमानसात गैरप्रतिमा निर्माण होईल अशा स्वरूपाचे अपीलकर्त्याचे हे वर्तन आहे व ते अत्यंत आक्षेपार्ह आहे. त्याबद्दल अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास जगन्नाथ साठे
मु.पो.चिखलगोठण, ता.तासगांव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगांव,
तहसील कार्यालय, तासगांव, ता.तासगांव, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तासगांव,
तहसील कार्यालय, तासगांव, ता.तासगांव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१७ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.विलास जगन्नाथ साठे<br>मु.पो.चिखलगोठण, ता.तासगांव, जि.सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तासगांव, तहसील कार्यालय,<br>तासगांव, ता.तासगांव, जि.सांगली श्री.रघुनाथ भगवान पोटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : निवासी नायब तहसीलदारांच्या आठवडा डायरीची प्रत मिळाली नाही.

अपिलीय प्राधिकारी : निवासी नायब तहसीलदारांना दैनंदिनी नसते, असे अपीलकर्त्यास वारंवार स्पष्ट करण्यात आले आहे. नसलेली माहिती ते मागत आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गजानन लक्ष्मण सूर्यवंशी
मु. पो. बालेघर, ता. वाई, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा सौ. वैशाली चेतन चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा श्री. के.जे.भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

इनाम जमिनीबाबत बेकायदेशीर व्यवहार झाले असून त्या मूळ मालकाला परत देण्यात याव्यात व आपल्या बाजूने निकाल लागलेल्या जमिनींच्या दप्तरी आपल्या नावाची नोंद करावी. तसे न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. गजानन लक्ष्मण सूर्यवंशी यानी लेखी निवेदनाद्वारे केली.

अपीलकर्ता यानी सन १९५४ ते १९७४ या कालावधीतील प्रकरणांबाबत नोंदी करण्याची अथवा नोंदींमधील दुरुस्तीची मागणी केली आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याचे त्याना विहित मुदतीत कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा श्री. के.जे.भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वाई, जि. सातारा सौ. वैशाली चेतन चव्हाण यांनी संबंधित प्रकरणात पुरविलेल्या कागदपत्रांच्या प्रतींसह केले. माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.विमल विठ्ठल सातपुते
फ्लॅट नं.ई-२०३, द्वारका साई हेरिटेज, शिवार गार्डन रोड,
सिंधू पार्कजवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पुणे यांचे कार्यालय,
जुना पुणे-मुंबई हायवे, चिंचवड, पुणे-४११०१९ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाययक पोलीस आयुक्त,
चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.विमल विठ्ठल सातपुते
फ्लॅट नं.ई-२०३, द्वारका साई हेरिटेज, शिवार गार्डन रोड,
सिंधू पार्कजवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे-प्रतिनिधी श्री.आर.जी.तनपुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमचा मुलगा दीपक याच्यावर भारतीय दंडविधान कलम ४९८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमच्या सुनेच्या मोबाईलवरून केलेल्या दूरध्वनींचा तपशील पोलीस देतात. परंतु आमच्या मुलाच्या मोबाईलवरील असा तपशील मात्र उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले जाते. न्यायालयीन प्रकरणात हा तपशील मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी प्रतिनिधी : अपीलकर्त्यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जानुसार दि.२९.६.२०१० च्या पत्रान्वये उपलबध माहिती दिली. त्यांचे चिरंजीव श्री.दीपक सातपुते यानी केलेल्या दूरध्वनीचा तपशील प्राप्त झाला नसल्याचा लेखी अहवाल संबंधित पोलीस ठाण्याने दिला आहे.

एकाच प्रकरणातील दोन व्यक्तींपैकी एका व्यक्तीचे मोबाईल दूरध्वनीचे तपशील मिळतात व अन्य व्यक्तीचे मिळत नाहीत, याबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी देऊ शकले नाहीत. असा तपशील पोलिसांनी न्यायालयात सादर केला आहे का, याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे यानी दोन दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु असा अहवाल आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे यानी अद्याप अहवाल सादर केलेला नाही, हा शिस्तभंग असून त्याबाबतच्या खुलाशासह अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर, पुणे यानी दि.१६.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास पुढील कारवाईस ते पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद फारूक महंमद हुसेन कमिशनर
१३०/२५, सिध्देश्वर पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सुशिलकुमार शिंदे उर्दू प्राथमिक शाळा, रंगराजनगर, हैद्राबाद रोड, जुळे सोलापूर नं.२, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१०४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महंमद फारूक महंमद हुसेन कमिशनर
१३०/२५, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.आबासाहेब मारुती सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सुशिलकुमार शिंदे उर्दू प्राथमिक शाळा,रंगराजनगर, हैद्राबाद रोड, जुळे सोलापूर नं.२, सोलापूर श्रीमती स्वालेहा अफजल खान

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सुशिलकुमार शिंदे उर्दू प्राथमिक शाळा,रंगराजनगर, हैद्राबाद रोड, जुळे सोलापूर नं.२, सोलापूर या शाळेमधील पायाभूत सुविधेसाठी मिळालेल्या अनुदानाच्या अनुषंगाने व गणवेशाबाबतच्या निविदा आदि संदर्भातील सन १९९८ पासूनची माहिती मागणारा अर्ज दि.२६.५.२०१० रोजी केला होता. परंतु जन माहिती अधिकाऱ्यानी अर्ज स्वीकारला नाही. अपिलीय प्राधिकारी यानी आदेश देऊनही त्यानी माहिती दिली नाही. माहिती म्हणून पाठविलेल्या टपालात कोरे कागद होते.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी अर्ज केला त्या काळात शाळेला उन्हाळी सुट्टी असल्यामुळे त्यांचे रजिस्टर्ड टपाल परत गेल्याचे दिसते. त्याबाबत आम्हाला कोणतीही कल्पना नव्हती. दि.१४.६.२०१० रोजी त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.१३.७.२०१० च्या पत्रान्वये कळविलेले शुल्क त्यानी भरले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दि.२९.१०.२०१० रोजी माहिती नि:शुल्क पाठविली. परंतु माहितीच्या प्रतींच्या जागी स्वत:च कोरे कागद घालून माहिती न मिळाल्याचा अपप्रचार अपीलकर्ता करीत आहेत. अपिलीय प्राधिकाऱ्यांसमोरही हीच माहिती समक्ष दिली. तीन वेळा माहिती देऊनही माहिती मिळाली नसल्याची तक्रार ते केवळ सूडबुध्दीने करीत आहेत.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुशिलकुमार शिंदे उर्दू प्राथमिक शाळा,रंगराजनगर, हैद्राबाद रोड, जुळे सोलापूर नं.२, सोलापूर श्रीमती स्वालेहा अफजल खान यानी दिलेल्या माहितीच्या प्रतींसह पूरक कागदपत्रे सादर केली.

अपिलीय प्राधिकारी : अपिलातील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यानी माहिती पाठविली. कोरे कागद मिळाल्याचे पाकिट अपीलकर्ता यानी सादर केले. परंतु ते सीलबंद नव्हते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करीत असून त्याची शहानिशा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. जन माहिती अधिकारी यानी माहिती दिल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यांनी सादर केलेला लिफाफा सीलबंद नसल्यामुळे त्यात जन माहिती अधिकाऱ्यानी पाठविलेले कोरे कागद होते की नाही, हे निसंदिग्धपणे सिध्द होत नाही. अपिलीय प्राधिकारी यानी संबंधित कागदपत्रांची व दिलेल्या माहितीची तपासणी करून अपीलकर्त्यास आणखी माहिती हवी असल्यास एक आठवड्यात नि:शुल्क पुरविली जाण्याची कार्यवाही करून आयोगाना अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश

आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यानी आपल्या कार्यालयाकडे सादर केलेली माहिती अपीलकर्त्यास दि.१०.१.२०११ रोजी देण्यात आली, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आबासाहेब मारुती सूर्यवंशी यानी दि.२८.१.२०११ च्या पत्रानवये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष खुशालचंद मालपाणी
९/८८, सांगली रोड, इचलकरंजी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जल अभियंता(पाणी पुरवठा विभाग),
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५८+७५९ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष खुशालचंद मालपाणी
९/८८, सांगली रोड, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.मनिष बाळकृष्ण पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा जल अभियंता(पाणी पुरवठा विभाग),
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.मनिष बाळकृष्ण पोवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि.२९.१०.२००९ व दि.७.११.२००९ रोजी दोन अर्जांद्वारे पाणीपुरवठा विभागाकडील विविध कामांची माहिती मागितली होती. दि.२६.११.२००९ व दि.७.१२.२००९ रोजी अनुक्रमे रू.३९० व रू.५९२ शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यानी कळविले. परंतु शुल्क भरण्यास गेलो असता भरून घेतले नाही. माहिती तयार असल्याचे पत्राद्वारे कळविले असतानाही प्रत्यक्षात कोणतीही माहिती तयार नव्हती. दि.४.२.२०१० रोजी अर्धवट स्वरूपाची व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे लेखी व तोंडी तक्रारीही केल्या तरीही तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनील जयराम आडके व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मनिष बाळकृष्ण पोवार यांच्याकडून परिपूर्ण माहिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नसल्याचा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाच्या निर्णयात नोंदविला आहे. तसेच माहिती न दिल्याबद्दल त्याना अपिलीय प्राधिकाऱ्यानी नोटीसही दिली आहे. सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही जन माहिती अधिकारी श्री.सुनील जयराम आडके व श्री.मनिष बाळकृष्ण पोवार यानी पूर्तता केली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले असून वेळोवेळी माहिती दिली आहे. दि.४.२.२०१० व ११.३.२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी श्री.मनिष बाळकृष्ण पोवार यानी विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यानी अपिलाच्या निर्णयात स्पष्टपणे नोंदविले आहे. जन माहिती अधिकारी यानी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित पत्रांच्या प्रतीसह सादर करावा व अपीलकर्ता यानी केलेले अर्ज व पत्रव्यवहार याच्या प्रती सादर कराव्यात. तसेच जन माहिती अधिकारी यानी एक आठवड्यात संबंधित संचिकेचे अवलोकन अपीलकर्त्यास करू द्यावे व आवश्यक असलेली माहिती द्यावी. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य कार्यवाही केली नसल्याचे सकृत्दर्शनी दिसत असले, तरी उभय बाजूंनी वरीलप्रमाणे कागदपत्रे सादर केल्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि जन माहिती अधिकारी यानी कोणताही खुलासा अद्याप सादर केलेला नाही व त्यानी दि.७.२.२०११ च्या पत्रान्वये दिलेली माहिती नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीपेक्षा वेगळी आहे. अद्यापही परिपूर्ण माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यानी दि.१८.१.२०११ व

दि.७.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. दि.७.१.२०११च्या पत्रान्वये आपण पाच मुद्दयांची माहिती मागितल्याचे श्री.मालपाणी यानी या पत्राच्या प्रतीसह नमूद केले आहे. मात्र हे मुद्दे मूळ अर्जातील नाहीत व मूळ अर्जात नसलेली अतिरिक्त माहिती अपिलात वा अन्य पत्राद्वारे मागता येणार नाही. आवश्यक असल्यास अपीलकर्ता अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेऊ शकतात. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अदद्यापही तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणताही खुलासा / अहवाल आयोगाला सादर केलेला नाही. त्यावरून शास्तीबाबत त्याना काहीही म्हणावयाचे नाही, असे दिसते. माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनील जयराम आडके व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मनिष बाळकृष्ण पोवार हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही न केल्याबद्दल तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी जल अभियंता(पाणी पुरवठा विभाग), इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.सुनील जयराम आडके व श्री.मनिष बाळकृष्ण पोवार हे शास्तीस पात्र ठरतात. त्याना प्रत्येकी रूपये १२५०० शास्ती करण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुनील जयराम आडके व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मनिष बाळकृष्ण पोवार यांच्या जुलै २०११, ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या जून २०११, जुलै २०११ व ऑगस्ट २०११ च्या वेतनातून (प्रत्येकी रूपये १२,५००/-) ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सत्यभामा नारायण कारंडे
एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग,
सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.जे.आर.आडसूळ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर विद्यमान-श्री.एफ.एल.उंबरते, तत्कालीन-श्री.अनिल शि.धोंगडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

एखतपूर, ता.सांगोला, जि.सोलापूर या हागणदारीमुक्त गावातील यशवंत ग्राम समृध्दी योजनांतर्गत बांधलेली शौचालये व इतर कामांबाबतची माहिती दि.८.१२.२००८ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.१९.१.२००९ रोजी ती निःशुल्क दिली , असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केले. मात्र आराखड्याप्रमाणे कामे झालेली नाहीत व शौचालयाच्या संख्येबाबतची खरी माहिती दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती सत्यभामा नारायण कारंडे यानी आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

आराखड्यानुसार कामे झाली नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. तसेच दिलेली माहिती योग्य असल्याचे दर्शविणारी कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी सादर केली. मात्र अपीलकर्त्यानी मागितलेल्या माहितीचे स्वरूप लक्षात घेता माहिती देण्यास सात दिवसांचा विलंब का लागला, याचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी करणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी त्याना सात दिवसांत आयोगाला खुलासा सादर करण्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी दि.५.३.२०११ च्या नोटिशीद्वारे विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एफ.एल.उंबरते व श्री.अनिल शि.धोंगडे याना आयोगाचे निर्देश कळविले. परंतु त्यानी कोणताही खुलासा अद्यापपर्यंत सादर केलेला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.जे.आर.आडसूळ यानी दि.३०.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. त्यानंतरही अद्यापही त्यांचा असा खुलासा आयोगाला प्राप्त झालेला नाही, याचा अर्थ त्याना विलंब व शास्तीबाबत काहीही म्हणावयाचे नाही. परिणामी ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा कोणताही खुलासा आयोगाला प्राप्त झालेला नाही, याचा अर्थ त्याना विलंब व शास्तीबाबत काहीही म्हणावयाचे नाही, असे दिसून येते. त्यामुळे विद्यमान श्री.एफ.एल.उंबरते व व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.अनिल शि.धोंगडे याना सात दिवस विलंबासाठी रूपये १७५० प्रत्येकी शास्ती करण्यात येत आहे. श्री.एफ.एल.उंबरते व श्री.अनिल शि.धोंगडे यांच्या जुलै २०११ या महिन्यांत मिळणाऱ्या जून २०११ च्या वेतनातून ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यानी करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंबादास बाळासाहेब व-हाडे
वेताळनगर, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वैराग,
ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.अविनाश दिनकर थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर विद्यमान श्री.अंगद मारूती माने, तत्कालीन-श्री.ए.डी.नाळगोंडा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.०७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

अपीलकर्ता श्री.अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे यानी ग्रामपंचायतीतर्फे सन २००० ते २००८ या काळात झालेल्या कामांची विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. त्यांच्या दि.२२.१२.२००८च्या अर्जाला दि.७.१.२००९ च्या पत्रान्वये उत्तर देऊन रूपये ३२,२५०/- शुल्क कळविले. ते त्यानी भरले नाही व आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद करून प्रथम अपील केले. तसा दाखला / पुरावा सादर करून जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडून माहिती घ्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर यानी दि.२.३.२००९ रोजी दिले. त्यानंतर पुन्हा दि.२४.३.२००९ रोजी स्मरणपत्र पाठविले. परंतु त्यानुसार पूर्तता न करता त्यानी आयोगाकडे अपील केले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील कार्यक्रमाला व आयोगापुढील सुनावणीलाही ते उपस्थित नव्हते, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर अनुक्रमे श्री.अंगद मारूती माने व श्री.ए.डी.नाळगोंडा व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.अविनाश दिनकर थोरात यांनी केले. त्यांनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

शुल्क न भरणे व दारिद्र्यरेषेखाली असल्याचा पुरावा सादर न करणे ही अपीलकर्त्याची कृती त्यांच्या कार्यपध्दतीबाबत संशय निर्माण करणारी आहे. त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशाबाबतच्या वस्तुस्थितीची चौकशी करून १५ दिवसांत अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद याना दि.२५.२.२०११ च्या पत्रान्वये कळविले. त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी कळविल्याप्रमाणे मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद यानी अपीलकर्त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील समावेशाबाबतच्या तपासणीचा अहवाल दि.२५.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश सुमंत वालावलकर
बी/५, क्षितीजा, मोहनवाडी, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.२,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण,
पुणे महानगरपालिका, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०२ + २३०३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश सुमंत वालावलकर
बी/५, क्षितीजा, मोहनवाडी, येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.२, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- प्रतिनिधी श्री.दिलीप काळू पावरा

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे- श्री.धर्मसिंह रजपूत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : इमारतीला दिलेले भोगवटापत्र व इमारतीतील हॉटेलला दिलेली परवानगी, पार्किंगच्या जागेचा बेकायदेशीर वापर इ. बाबीत मी तक्रार केल्यानंतर अधिकाऱ्यांनी इमारत मालकाला नोटिसा पाठविल्या. परंतु सन २००७ पासून प्रयत्न व वारंवार पत्रव्यवहार करूनही महानगरपालिकेने योग्य कारवाई केलेली नाही व त्याबाबतची माहितीही दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी उपस्थित केलेले प्रकरण सन १९९८ मधील असून शोध घेऊन माहिती दिली. इमारत मालकाने आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे त्यांचे भोगवटापत्र प्रलंबित ठेवले आहे. मंजूर नकाशाव्यतिरिक्तच्या बांधकामामुळे अतिक्रमणविषयक कारवाई करण्यात आली आहे. मंजूर आराखड्याप्रमाणे बांधकाम नसल्याची अपीलकर्त्याची तक्रार, तसेच खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही.

अपीलकर्त्यानी मागणी केलेल्या माहितीचा विषय एका हॉटेलच्या संदर्भातील असून नियमाचे पालन होत नसल्याची तक्रार त्यात अंतर्भूत आहे. मंजूर आराखड्यानुसार बांधकाम आहे की नाही, तसेच आरोग्य विभागाने सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून घेऊन हॉटेलला परवाना दिला आहे की नाही, हे स्पष्ट होणे आवश्यक असून जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे यानी त्यानुसार तपासणी करून वस्तुस्थितीचा अहवाल एका आठवड्यात आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल अद्याप आयोगाला प्राप्त झालेला नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे यानी अद्याप अहवाल सादर केलेला नाही. त्याविषयीच्या खुलाशासह दि.२५.६.२०११ पर्यंत अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम
ब्लॉक नं. बी-१/११/१, ५४ ब, भवानी पेठ,
होमकर नगर, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त पुणे यांचे चिटणीस,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११०/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (महसूल),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री. सुभाष रा. धर्माधिकारी

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त पुणे यांचे चिटणीस,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री. शरद नाईक

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. दादाभाऊ जोशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम यानी प्रस्तुत अपिलात मागितलेली माहितीच अपील क्र. ११०९ मध्ये मागितली होती व त्याचा निर्णय आयोगाने दिला आहे. अपीलकर्ता वारंवार त्याच स्वरुपाची विचारणा करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभागीय आयुक्त, पुणे यांचे चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री. शरद नाईक व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री. सुभाष रा. धर्माधिकारी यानी केले. ते रास्त आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये खुलासा, स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशी विचारणा करता येत नाही, हे स्पष्ट करुनही पुनःपुन्हा त्याच स्वरुपाचे अर्ज व अपिले करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय करु नये, याची समज अपीलकर्ता श्री. रमारमण व्यंकटेश कोंतम यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पी. जी. मुतालीक
बालगंधर्व थिएटर जवळ, मिरज
सांगली ४१६ ४१० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह. निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८२/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह. निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी
श्री. एम. आर. भाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मिरज अर्बन को-ऑप. बँक लि., मिरज, ता. मिरज, जि. सांगली या बँकेच्या संदर्भातील चौकशीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. पी. जी. मुतालीक यानी मागितली होती. बँकेशी संबंधित असल्यामुळे अर्ज अवसायकांकडे वर्ग केला. तसेच चौकशी पूर्ण झाली नसल्यामुळे त्यावर परिणाम होऊ नये म्हणून कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत. तथापि चौकशी अधिकाऱ्यांनी रोजनाम्याच्या सर्व छायाप्रती अपीलकर्त्यास दिल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी, दि मिरज अर्बन को-ऑप. बँक लि., मिरज यानी अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या पत्रासह नमूद केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत लक्ष्मण कांबळे
मु. पो. वांगी, ता. कडेगाव, जि. सांगली. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, कडेगांव

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, कडेगांव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३४/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सूर्यकांत लक्ष्मण कांबळे
मु. पो. वांगी, ता. कडेगाव, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, कडेगांव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाकडे श्री. सूर्यकांत लक्ष्मण कांबळे यानी अपील केले असले तरी मूळ अर्ज त्याचा नाही. त्यांची भावजय सौ. विद्या चंद्रकांत कांबळे यांच्या मूळ अर्ज व प्रथम अपील आहे. जमीन एकत्रिकरण योजनेतील सन १९७८-७९ सालची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून संबंधित फेरफार आढळून येत नाही. एकीकरण कायद्यामुळे नाव कमी झाले, हे अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र एका व्यक्तीच्या मूळ अर्जावर अन्य व्यक्तीने अपील करणे नियमबाहय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उध्दव सदाशिव पाटील
राजगृह प्लॉट नं. ४१, पेठ वडगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ४१६ ४१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हा व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. उध्दव सदाशिव पाटील
राजगृह प्लॉट नं. ४१, पेठ वडगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ४१६ ४१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हा व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर श्री. महेश सत्यवान बोटले

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
जि. कोल्हापूर श्री. सुभाष लक्ष्मण जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - कर्मचा-यांच्या वेतनाच्या संदर्भातील आदेशाची प्रत व अन्य माहिती मागितली होती. मुद्या क्र. २ व ३ ची माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. नमूद केल्याप्रमाणे आदेशच झालेला नसून माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपिलकर्त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ प्रमाणे पत्राची प्रत व अनुषंगिक माहिती विहित मुदतीत दिली. ते ज्या आदेशाची प्रत मागत आहेत तसा आदेशच झालेला नाही. त्यामुळे तशी कागदपत्रे उपलब्ध होणे शक्य नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली असून न झालेल्या आदेशाची प्रत मागणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित स्वरुपाचा आदेश झ ाला नसल्याचे पत्र जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जि. कोल्हापूर श्री. सुभाष लक्ष्मण जाधव यानी द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं.२०बी, बिल्डिंग सी-३, सूर्यलोकनगरी, पुणे-सोलापूर रोड, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त, मुख्यालय-२,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतृश्रृंगी विभाग, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं.२०बी, बिल्डिंग सी-३, सूर्यलोकनगरी, पुणे-सोलापूर रोड, पुणे-१३

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतृश्रृंगी विभाग, पुणे श्री.वि.रा.माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगासमोरील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

पुण्याच्या पोलिस आयुक्त कार्यालयात एक खिडकी योजनेत दि. २९.१२.२००८, दि.५.१.२००९, दि. १६.१.२००९ दि. ९.४.२०१० अशा दिवशी दिलेल्या ४ अर्जांबाबत पोलिस आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.२४.२.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबत काहीही कळविले नाही. या अर्जांबाबत माहितीच्या अधिकारात केलेल्या अन्य अर्जांनाही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे दि.१५.४.२००९ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल केल्यावर आपण अपिलीय प्राधिकारी नसल्याचे पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पुणे डॉ.महेश पाटील यानी कळविले. त्यानंतर दि.११.६.२००९ रोजी तत्कालीन सहाय्यक पोलिस आयुक्त (चतु:श्रृंगी) श्री.एम.पी.कराडे यानी संबंधित अर्ज चतु:श्रृंगी पोलिस ठाण्याकडे आढळून येत नसल्याचे कळविले. कोणतीही कार्यवाही विहित मुदतीत करण्यात आली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.उदयराज अनिल आळंदकर यानी केले.

अर्जांबाबतचा तपशील अपीलकर्ता यानी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यानी दि.२७.१०.२०१० च्या पत्रान्वये तपशील सादर केला. आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर ४४ दिवसांनी-म्हणजे मूळ अर्जापासून १८३ दिवसांमध्ये या अर्जांबाबतचा तपशील आपल्याला देण्यात आला. तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.एस.बी.सूर्यवंशी यांच्या विरुध्द एका अर्जात तक्रार असल्यामुळे श्री.सूर्यवंशी, श्री.कारंडे व श्री.पाटील यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यास विलंब लावला. श्री.सूर्यवंशी यांची बदली झाल्यानंतर ही माहिती देण्यात आली. जे अर्ज त्यांच्याकडे प्राप्तच झाले नव्हते त्यावरील माहिती कशी दिली, याचा खुलासा त्यात नाही, असे श्री. आळंदकर यानी या निवेदनात नमूद केले आहे.

दि.१८.११.२०१० च्या पत्रान्वये श्री.आळंदकर यानी आणखी एक निवेदन सादर केले. माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतृ:श्रृंगी विभाग, पुणे यांच्याकडे संबंधित अर्जांबाबत विचारणा केल्यानंतर पुढीलप्रमाणे माहिती मिळाली : दि.२१.१२.२००८ चा अर्ज दि. २९.१२.२००८ रोजी, दि. ५.१.२००९ चा अर्ज दि. ९.१.२००९ रोजी, व दि. ९.२.२००९ चा अर्ज दि. ११.२.२००९ रोजी परिमंडळ ३ यांच्याकडे पाठविले असल्याचे सहा. पोलिस आयुक्त अभियान, पुणे शहर श्री. पी.बी.लोखंडे यानी कळविले. परिमंडळ ३ मधील चतु:श्रृंगीचे इन्स्पेक्टर श्री. एस.बी.सूर्यवंशी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतृ:श्रृंगी विभाग, पुणे श्री.एम.पी.कराडे व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पुणे डॉ.महेश पाटील यानी अर्ज प्राप्त झालेले असतानाही जाणीवपूर्वक खोटी माहिती दिल्याचे यातून स्पष्ट होते. म्हणून संबंधितांवर दंडासह कडक कारवाई करावी, अशी मागणी श्री.आळंदकर यानी या निवेदनातही केली आहे.

श्री.आळंदकर यांचे निवेदन व त्यानी सादर केलेली कागदपत्रे पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही. तसेच अर्जांबाबतच्या वस्तुस्थितीशी विसंगत अशी माहितीही विलंबाने देण्यात आली आहे. असे सकृत्‌दर्शनी दिसून येते. मात्र याबाबत वरिष्ठ पातळीवर अधिक चौकशी होऊन नेमकी परिस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे, म्हणून पुढीलप्रमाणे अंतरीम आदेश देण्यात येत आहेत :

## <u>अंतरीम आदेश</u>

अपीलकर्ता यांनी माहिती मागणी अर्जात विचारणा केलेल्या अर्जांसंबंधी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतृःश्रृंगी विभाग, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार तपशील, विलंब झाला असल्यास त्यांचा त्याबाबतचा खुलासा, दिलेल्या माहितीची सत्यासत्यता याची चौकशी पोलीस आयुक्त, पुणे शहर यानी करावी व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि.३०.६.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा. त्यानंतर प्रस्तुत अपिलावरील अंतिम आदेश देण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० मे २०११**

**प्रत:पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे याना पुढील कारवाईसाठी.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती उषा आबा अहिवळे
दैनिक गंधवार्ताशेजारी, ११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी,
जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, प्रशासकीय भवन, एस.टी.स्टँडसमोर, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय,
प्रशासकीय भवन, एस.टी.स्टँडसमोर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५७ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती उषा आबा अहिवळे
दैनिक गंधवार्ताशेजारी, ११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा कृषी अधिक्षक अधिकारी, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय,
प्रशासकीय भवन, एस.टी.स्टँडसमोर, सातारा प्रतिनिधी श्री.सुरेश अनंत मगदूम

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय,
प्रशासकीय भवन, एस.टी.स्टँडसमोर, सातारा तत्कालीन-श्री.जितेंद्र पांडुरंग शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी आयोगापुढील सुनावणीत पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कृषी खात्यातील नियम, नियमावलीच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहितीबाबत व तक्रारीबाबत योग्य कार्यवाही झाली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांचा दि.२.३.२०१० चा अर्ज विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाकडे केला होता. एकच माहिती दोन अधिकाऱ्यांकडे त्यानी मागितली होती. अर्ज व अपील वरीष्ठ कार्यालयाकडून आमच्याकडे आल्यानंतर सुनावणी घेण्यात आली. अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती व काही तक्रारी, असे त्यांच्या अर्जाचे स्वरूप होते. एवढी विस्तृत माहिती संकलित करून देणे, तसेच सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या नियमावलीच्या प्रती अन्वयार्थाच्या / भाष्याच्या सह देणे शक्य नाही, तसे त्याना स्पष्ट केले. तसेच अर्जातील तक्रारीबाबतचा भाग स्वतंत्र समजून त्यावर कार्यवाही करावी, असेही त्यांच्या मागणीनुसार ठरले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीच्या स्वरूपाची माहिती ही जन माहिती अधिकाऱ्यांच्याच नियंत्रणाखाली असल्याचे म्हणता येणार नाही. त्यामुळे त्यानी ती देणे बंधनकारक नाही. आरोपाच्या स्वरूपाच्या भाष्यासह तक्रार / कारवाईची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाहुबली कबाडगे
प्लॉट नं.८, शिवाजी कॉलनी, नेमीनाथनगर, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्रीमती मनिषा आ.कुंभार | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाहुबली कबाडगे यानी पुनर्वसन अधिकारी / कर्मचारी यांच्या मालमत्तेचे विवरणपत्र व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. अपील क्र.१६०३/२०१०/सांगली मध्ये याच प्रकारची माहितीची मागणी त्यानी केली होती. आयोगाने ते अपील निकाली काढले आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले होते. परंतु ते आले नाहीत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्रीमती मनिषा आ.कुंभार यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्रीमती मनिषा आ.कुंभार यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. विशाल शिंदे
१०५०, नवी नाना पेठ, अपीलकर्ता
भारत टॉकिज जवळ, पुणे - २

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२८/२००९/पुणे + १२२९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** ॲड. विशाल शिंदे
१०५०, नवी नाना पेठ, भारत टॉकिज जवळ, पुणे - २

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. नरेंद्र कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुण्यातील नाना पेठेतील सिटी सर्व्हे क्र.१०४६ ते १०५४ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली विकसक 'मे. ईश्वर कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.' तर्फे श्री. ईश्वर परमार याना काम देण्यात आले. परंतु सदनिका दिलेल्या झोपडपट्टीवासीयांची नावे, टीडीआर वापरल्याबाबतचा तपशील, संबंधितांचे करारनामे, केलेले बेकायदेशीर बांधकाम याबाबत माहिती दिली जात नाही. या कामात मोठा गैरव्यवहार असून तो उघड होऊ नये म्हणून कोणतीही माहिती दिली जात नाही. सर्व संबंधित विभागांकडे अर्ज केले असता अन्य विभागांकडे माहिती मागण्यास सांगून जबाबदारी इतरांवर ढकलण्याचा व टोलवाटोलवीचा प्रयत्न चालू आहे. या योजनेसंदर्भातील तक्रारीनंतर मा. राष्ट्रपतींच्या आदेशानुसार त्याना पाठविलेल्या अहवालाची प्रतही दिली जात नाही. अनेक झोपडपट्टीवासीयांना अद्याप सदनिका मिळाल्या नसून त्या अन्य व्यक्तींना दिल्या गेल्या आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड. विशाल शिंदे यानी केली. याच संदर्भात अपील क्र.२८७९ मध्ये आयोगाने दि.४.११.२००९ रोजी आदेश देऊनही परिपूर्ण माहिती दिली गेली नाही, असेही त्यानी नमूद केले.

संबंधित काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे केले जाते. त्यामुळे पुढील प्रक्रियेत आमच्या कार्यालयाचा संबंध येत नाही. आमच्याकडील सर्व कागदपत्रे दिली आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. नरेंद्र कुलकर्णी यानी सांगितले.

विकसकाने आमच्याकडे सादर केलेल्या यादीची प्रत ॲड. शिंदे याना देण्यात आली असून त्यानी केलेल्या सदनिकांच्या वाटपाबाबतची माहिती आमच्याकडे नाही. रजिस्टर करारनामा झाल्यानंतर त्याबाबतची नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट होईल. हा जुना प्रकल्प असून अद्याप त्याचे काम व पुनर्वसन पूर्ण झ ालेले नाही. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे, मुंबई उच्च न्यायालय येथे पात्र व्यक्तींच्या यादीबाबत दावे चालू होते. २७६ झोपडपट्टी गाळाधारकांनी अद्याप ताबा सोडलेला नाही. काहींनी सोडला. परंतु ते नव्या ठिकाणी गेले नाहीत. ॲड. शिंदे याना हवी असलेली माहिती देण्याबाबत संबंधित सर्व खात्यांना कळविले व त्यानी माहितीही दिली. ॲड. शिंदे याना अभिलेखही अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. हेमंत देवधर यानी केले. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार ॲड.शिंदे याना सर्व माहिती व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक

अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. नरेंद्र कुलकर्णी यानी दि. ३.१.२०११ च्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह आयोगास अवगत केले. तथापि आपल्याला परिपूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार ॲड. शिंदे यानी दि. १६.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता ॲड. विशाल शिंदे यानी मांडलेला विषय हा व्यापक सार्वजनिक हिताचा व शासकीय योजनेच्या अंमलबजावणीतील पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा असा आहे. त्यामुळे त्याबाबतची सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. सदनिकांचे वाटप केलेल्या गाळेधारकांची नावे महानगरपालिकेकडे /झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे उपलब्ध नसतील, तर त्यानी ती विकसकाकडून प्राप्त करून घेऊन सदनिकानिहाय यादी नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध ठेवणे, करारनाम्यांच्या प्रमाणित प्रती प्राप्त करून घेणे, टीडीआरच्या वापराचा नेमका तपशील उपलब्ध करणे आदी बाबींची पूर्तता पुणे महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन विकास प्राधिकरण यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसारही बंधनकारक आहे. वस्तुतः ही माहिती या दोन्ही संस्थांनी स्वयंस्फूर्तीने एकत्रित संकलित करणे व नागरिकांसाठी उपलब्ध ठेवणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसारही आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शासनाने आखलेल्या योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे होते, याचा पूर्ण तपशील मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. परंतु तसे होण्याऐवजी मागणी केल्यानंतरही विविध विभागांकडे माहिती असल्याचे उत्तर दिले जाते व संबंधित प्रकरणातील नेमके चित्र स्पष्ट होत नाही, हे सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेचे निदर्शक नाही. म्हणून संबंधित प्रकरणातील सर्व माहिती/कागदपत्रे एकत्रितपणे उपलब्ध करून देणे ही सार्वजनिक प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त, महानगरपालिका, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांची जबाबदारी आहे. मात्र संबंधित प्रकरणात भ्रष्टाचार वा अन्याय झाल्याच्या अथवा नियमानुसार काम न झाल्याच्या अपीलकर्त्याच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या निर्णय कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपिले मान्य करण्यात येत आहेत.

(२) पुण्याच्या नाना पेठेतील सिटी सर्व्हे क्र.१०४६ ते १०५४ मधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कार्यवाहीबाबतची सर्व माहिती आयुक्त, महानगरपालिका, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यानी संकलित स्वरूपात एकत्रितरीत्या दि.२०.६.२०११-पर्यंत अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावी. अपीलकर्त्यांसह कोणत्याही नागरिकाला ती सहजी प्राप्त होईल याची व्यवस्था त्यांनी करावी.

(३) अपीलकर्ता ॲड. विशाल शिंदे यानी आयोगाला सादर केलेल्या दि.१६.५.२०११ च्या निवेदनाची प्रत आयुक्त, महानगरपालिका, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांना सादर करावी. त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती / संचिका अवलोकनासाठी आयुक्त, महानगरपालिका, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांनी उपलब्ध करून द्याव्यात.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही करून आयुक्त, महानगरपालिका, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांनी दि. २५.६.२०११ पर्यंत आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. शकुंतला देवका मोरे
ग्रृप ग्रामपंचायत खटकाळे खैरे, ता. जुन्नर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. शकुंतला देवका मोरे
ग्रृप ग्रामपंचायत खटकाळे खैरे, ता. जुन्नर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. उमाकांत शंकरराव शेरकड

**जन माहिती अधिकारी** तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. बाळू कृष्णा केदारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका शिक्षकाने बेकायदेशीररीत्या घेतलेला घरभाडे भत्ता व प्रोत्साहन भत्ता वसूल करण्याबाबतची माहिती वर्ष होऊनही मिळाली नाही. तसेच ती वसुली करावी व संबंधित शिक्षकावर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. १७.२.२०१० च्या अर्जानुसार संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून माहिती मागविली व तसे अपीलकर्त्यास दि. ३.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता रक्कम वसुलीची व कारवाईची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि संबंधित प्रकरणातील वसुलीबाबतच्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. संबधित मुख्याध्यापकांकडून माहिती मागविल्याचे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांची जबाबदारी संपत नाही. त्यानी माहितीबाबत पुढे कोणताही पाठपुरावा केल्याचे दिसत नाही. संबंधित मुख्याध्यापकांकडून खुलासा व माहिती घेऊन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. बाळू कृष्णा केदारी यानी आठ दिवसांत आयोगाला खुलाशासह अहवाल सादर करावा. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतील, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयोगाने दिलेल्या मुदतीत कोणतीही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ. शकुंतला देवका मोरे यानी दि. ७.३.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी श्री. बाळू कृष्णा केदारी यानी कोणताही खुलासा/अहवाल सादर केलेला नाही. याचा अर्थ माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीविषयी व विलंबाविषयी त्याना काहीही म्हणावयाचे नाही, असा होतो. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीची स्पष्टता, पूर्तता व आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. बाळू कृष्णा केदारी यानी केलेली नाही. याबाबतची समज म्हणून त्याना रु. ५,०००/- शास्ती करण्यात येत

असून शास्तीची रक्कम श्री. केदारी यांच्या जुलै २०११ व ऑगस्ट २०११ च्या अनुक्रमे ऑगस्ट-२०११ व सप्टेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून समान हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता. आंबेगाव, जि. पुणे श्री. उमाकांत शंकरराव शेरकड यानी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. संबंधित शिक्षकाकडून रक्कम वसूल करण्याच्या अपीलकर्त्यांच्या मागणीबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यानी दि. २०.६.२०११ पर्यंत अपीलकर्त्यांना निःशुल्क पुरवून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भुजगोंडा मलगौंडा पाटील,
मु.पो.एरंडोली, ता. मिरज , जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, मिरज

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत एरंडोली, ता. मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३२/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भुजगोंडा मलगौंडा पाटील,
मु.पो.एरंडोली, ता. मिरज , जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, मिरज श्री. डी. आर. गुरव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत एरंडोली, ता. मिरज, जि. सांगली श्री. बी. आय. सातपुते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वेगवेगळया योजनांमधील लाभार्थी, दारिद्रय रेषेखालील कुटुंबे यांच्या याद्या व इतर माहिती दोन अर्जांव्दारे मागितली होती. वर्ष होऊनही पूर्ण माहिती अद्याप मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी- श्री. पाटील यानी १० वर्षांच्या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. ती पंचायत समिती आदींकडून संकलित करावी लागणार असल्यामुळे देण्यास उशिर होईल, असे तोंडी सांगितले होते. परंतु लेखी कळविले नाही. आता पूर्ण माहिती तयार आहे.

प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर - दि. ७.६.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली.

अपीलकर्त्यांच्या दि. ८.४.२०१० च्या अर्जाला जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यानी दि.७.५.२०१० पर्यंत उत्तर देणे आवश्यक होते. परंतु दि. ७.६.२०१० रोजी त्यानी माहिती दिली. या विलंबाचा त्यानी केलेला खुलासा समाधानकारक नाही. ते शास्तीस पात्र ठरतात. अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करुन घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत एरंडोली, ता. मिरज, जि. सांगली श्री. बी. आय. सातपुते यानी ३० दिवस विलंबाने माहिती दिल्याबद्दल (३० x २५०) रु. ७,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. सातपुते यांच्या जुलै २०११, ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ च्या अनुक्रमे ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११ व आक्टोंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून समान तीन हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा

विस्तार अधिकारी (वर्ग-१) पंचायत समिती, मिरज यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक विश्वासराव सरनोबत
रा. पडखंबे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, भुदरगड, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
पडखंबे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अशोक विश्वासराव सरनोबत
रा. पडखंबे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती,
पडखंबे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. गुलाब लालसाब शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जलस्वराज्य प्रकल्पाबाबतची ठेकेदारांची बिले आदिसह कागदपत्रांची मागणी केली होती. ग्रामसेवकांनी अर्ज अध्यक्ष/सचिव ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्याकडे वर्ग केला. त्यानी आधी १७५०/- व नंतर १५००/- रुपये शुल्क कळविले. ते भरुन चलन सादर केल्यावर नको असलेली कागदपत्रे दिली व आपण राजीनामा दिला असल्यामुळे आपल्याकडे माहिती मागू नये, असे अध्यक्षांनी नंतर कळविले.

जन माहिती अधिकारी- तत्कालीन अध्यक्ष/सचिव यानी अपीलकर्त्यांकडून शुल्क भरुन घेतले. त्यावेळी लेखा तपासणीसाठी जिल्हा परिषदेकडे दप्तर पाठविण्यात आले असल्यामुळे सर्व कागदपत्रे उपलब्ध नव्हती. उपलब्ध १५७ पृष्ठांच्या प्रती दिल्या. समितीचे अध्यक्ष व सचिव हे शासकीय सेवक नाहीत

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत व योग्य कार्यवाही केली आहे. त्यांच्या नियंत्रणाखाली नसलेल्या समितीकडून मिळालेली माहिती त्यानी दिली आहे. परंतु दिलेल्या पृष्ठांच्या प्रती लक्षात घेता आकारलेले शुल्क अवाजवी आहे. ते अपीलकर्त्यास परत केले जाणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमावलीतील तरतुदीनुसार रु. २/- प्रतीपृष्ठ प्रमाणे १५७ पृष्ठांची रु. ३१४/- एवढी रक्कम वजा जाता अपीलकर्त्याने भरलेल्या शुल्कातील सर्व रक्कम त्याना परत करावी. तसेच लेखा तपासणीसाठी सादर केलेले दप्तर प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती, पडखंबे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. गुलाब लालसाब शेख यानी दि. २०.६.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा व अपीलकर्त्यास त्याची प्रत पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. कबीर इस्माईल शेख
रा. सर्व्हे नं. ४६, रॉ-हा., १० गंगा व्हिलेज,
हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे - २८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,
परिमंडळ ४, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरीक्षक,
वानवडी पोलिस स्टेशन, हडपसर, पुणे - २८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. कबीर इस्माईल शेख
रा. सर्व्हे नं. ४६, रॉ-हा., १० गंगा व्हिलेज,
हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,
परिमंडळ ४, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, येरवडा, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. एम. आर. कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरीक्षक,
वानवडी पोलिस स्टेशन, हडपसर, पुणे श्री. व्ही. टी. पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आमच्या घरी चोरी झाल्यानंतर सोसायटीतील सिक्युरिटी एजन्सीकडे परवाना नसल्याबद्दलची फिर्याद दाखल करण्याची मागणी पोलिसांकडे केली होती. परंतु संयुक्त पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार अशी कारवाई करता येत नसल्याचे पोलिसांनी कळविले. या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- पुणे पोलिस नोटीस हे फक्त खातेनिहाय वापरासाठी गोपनीय स्वरुपाचे असल्याने आदेशाची प्रत देता येत नाही, असे कळविले. मात्र संबंधित सिक्युयरिटी एजन्सीबरोबर केलेल्या पत्रव्यवहाराची छायांकित प्रत अपीलकर्त्यास पुरविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता विनापरवाना सिक्युरिटी एजन्सीबाबतची कारवाई व त्या अनुषंगाने पोलिस अधिकाऱ्यांनी काढलेले आदेश हे पोलिस खात्यांतर्गत आहेत, म्हणून गोपनीय ठरतात, हा दावा योग्य नाही. खात्यांतर्गत स्वरुपाचे आदेश असले तरी नागरिकांना ते ज्ञात असले पाहिजेत. तो त्यांचा हक्क आहे. म्हणून उपरोक्त प्रकरणातील आदेशाची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक,वानवडी पोलिस स्टेशन, हडपसर, पुणे श्री. व्ही. टी. पवार यानी दि. २०.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय ज्ञानू मंडले
मंडले वस्ती, महूद रोड, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सांगोला, तहसील कार्यालय, सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला,
तहसील कार्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सांगोला, तहसील कार्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.सुधाकर साहेबराव भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, तहसील कार्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा रमेश ठोकडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.०७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झ ााल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय ज्ञानू मंडले व त्यांचे दोन बंधू वेगवेगळ्या विभागांकडे विविध स्वरूपाची माहिती मागणारे अर्ज करीत असतात. दारिद्र्यरेषेखालील यादीतील त्यांच्या समावेशाबाबत चौकशी करण्यात येईल, असे सांगितल्यानंतर दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद करणारे अर्ज थांबले. मात्र आवश्यक माहिती त्याना देण्यात आली असून माहिती मिळाल्याचे व तक्रार संपल्याचे लेखी निवेदन त्यानी दि.३.४.२००९ रोजी दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, तहसील कार्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा रमेश ठोकडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला, तहसील कार्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.सुधाकर साहेबराव भोसले यानी केले. अपीलकर्त्यांच्या संदर्भित लेखी जबाबाच्या प्रतीसह पूरक कागदपत्रे त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधाकर दत्तात्रय जोशी
१०/ए-३, राजमयुर (२) सोसायटी,
एरंडवणे, पुणे ४११ ००४. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/०२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुधाकर दत्तात्रय जोशी
१०/ए-३, राजमयुर (२) सोसायटी, एरंडवणे, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे श्री. मनोज पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे श्री. के. सी. लवंगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मी राहतो त्या परिसरातील वाहतुकीच्या प्रश्नांच्या अनुषंगाने काही सूचना करणारे पत्र वाहतूक विभागाच्या पोलिस उपायुक्तांना पाठविले होते. साडेचार महिन्यात त्यावर कोणतीही कार्यवाही केली गेली नाही व त्याबाबतची माहिती समाधानकारक मिळाली नाही. या सूचनांची दखल न घेता 'सूचनांच्या धारिकेला पत्र ठेवण्यात आल्याचे' जन माहिती अधिकारी यानी कळविले. एक जबाबदार नागरिक म्हणून पोलिसांना मदत करण्यासाठी दिलेल्या पत्राला अशा प्रकारचा प्रतिसाद मिळाला, हे रास्त नाही.

जन माहिती अधिकारी - वाहतुकीविषयी नागरिकांकडून विविध स्वरुपाच्या सूचना केल्या जातात. योग्य वाटल्यास त्याची अंमलबजावणी होते.

सूचनांची दखल न घेण्याबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे श्री. के. सी. लवंगे यानी त्याना विहित मुदतीत उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सय्यद अब्दुल कादर रहेमतुल्ला
स.नं. ५२, मक्का मशीद मागे, निशांत क्लिनिक,
भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पुणे ४८. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
पूना कॉलेज , आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, कॅम्प, पुणे - १
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य,
पूना कॉलेज , आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, कॅम्प, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सय्यद अब्दुल कादर रहेमतुल्ला
स.नं. ५२, मक्का मशीद मागे, निशांत क्लिनिक,
भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पुणे ४८.

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
पूना कॉलेज , आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स,
कॅम्प, पुणे डॉ. आफताब अनवर शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -पूना कॉलेजच्या तत्कालीन प्राचार्यांच्या संदर्भात मागितलेली माहिती परिपूर्ण मिळाली नाही. संस्था अल्पसंख्याक असल्यामुळे माहिती देण्याचे बंधन नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, पूना कॉलेज, आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स, कॅम्प, पुणे डॉ. शकील अहमद यानी दिले आहे.

जन माहिती अधिकारी- भारतीय राज्य घटनेच्या कलम २९, ३० व १९१ (जी) अन्वये अल्पसंख्याक संस्था म्हणून अंजुमन खैरुल इस्लाम संस्था, मुंबई संरक्षित आहे. तसेच विश्वस्त संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही असा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय असून माहिती देऊ नये, अशा मला अंजुमन खैरुल इस्लाम संस्था, मुंबई संस्थेच्या सूचना आहेत. त्यामुळे माहिती देता येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अंजुमन खैरुल इस्लाम संस्था/पूना कॉलेज माहिती देण्याबाबत नकारात्मक भूमिका सातत्याने घेत असल्याचे दिसून येते. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गाभा असून 'अल्पसंख्याक' म्हणून कोणत्याही संस्थाना त्यातून सूट दिलेली नाही. त्यामुळे अशा प्रकारचे कारण देणे नियमबाहय व अपारदर्शकतेचे निदर्शक आहे. ही संस्था अनुदानित असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५०६७/२००९ व रिट पिटीशन क्र.५१६८/२०१० प्रकरणी दिलेल्या निकालानुसार अनुदानित शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार काटेकोरपणे कार्यवाही करणे अंजुमल खैरुल इस्लाम संस्था/पूना कॉलेज या संस्थेवर/महाविद्यालयावर बंधनकारक आहे, याची जाणीव संस्थेला देण्यात येत आहे. यानुसार संस्थेने कार्यवाही न करणे उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणारे ठरेल, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अनुषंगिक कारवाईस पात्र ठरेल, याची समज जन माहिती अधिकाऱ्यांमार्फत अंजुमन खैरुल इस्लाम संस्था/ पूना कॉलेज यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार देय ठरणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, पूना कॉलेज, आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, कॅम्प, पुणे यानी निःशुल्क पुरवाव्या व दि. ३०.६.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं. २० अी, बिल्डिंग सी-३, अपीलकर्ता
सूर्यलोकनगरी, पुणे-सोलापूर रोड
पुणे ४११ ०१३.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय,
पिंपरी ४११ ०१७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
'ड' प्रभाग स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय,
पिंपरी ४११ ०१७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>'ड' प्रभाग स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय,<br>पिंपरी श्री. बळवंत तुकाराम बनकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीसाठी संचिका शोधण्याकरिता मजूर लावले. म्हणून ६ वर्षांसाठी प्रतिवर्षी रु. ४०/- प्रमाणे रु. २४०/- शोधणावळ शुल्क आकारले. हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अयोग्य असल्यामुळे परत मिळावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. उदयराज अनिल आळंदकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्यांनी सन २००३ पासूनच्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. कार्यालयाचे स्थलांतर व नूतनीकरण यामुळे मजूर लावून संचिका शोधणे आवश्यक होते. तसे करुन मनुष्य दिवसाप्रमाणे नाममात्र शुल्क आकारणी केली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,'ड' प्रभाग स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय, पिंपरी श्री. बळवंत तुकाराम बनकर यानी केले.

संबंधित प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेता अभिलेखांच्या शोधासाठी शासनाने शोधणावळ शुल्क पूर्व निर्धारित केले नसल्यास तशी शुल्क आकारणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येणार नाही. त्यामुळे ही रक्कम जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास चार दिवसांत परत करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, 'ड' प्रभाग स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय, पिंपरी श्री. बळवंत तुकाराम बनकर यानी विहित मुदतीत सादर केला नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यवाहीबाबत आवश्यक पारदर्शकता राखलेली नाही. त्याबद्दल समज म्हणून रु. ५००/- शास्ती लावण्यात येत असून शास्तीची रक्कम श्री. बळवंत तुकाराम बनकर यांच्या जून २०११ च्या अनुक्रमे जुलै २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय

प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका याचे कार्यालय, पिंपरी यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रसाद विठ्ठलराव पाटील
मु. पो. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रसाद विठ्ठलराव पाटील
मु. पो. पानगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर श्री. ए. एन. नागरगोजे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी,
जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एम. डी. देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -बार्शी तालुक्यातील प्रमुख रस्त्यांबाबतची सन २००१ ते २०१० या कालावधीतील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी माहिती विलंबाने, अपुरी व खोटी माहितीी दिली. त्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. दिलेली माहिती व रस्त्यांबाबतची प्रत्यक्षातील परिस्थिती यात बरीच तफावत आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी - रस्ते विकासाचा जो आराखडा आमच्या कार्यालयाला प्राप्त झाला त्याची प्रत जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यांना दिली. दि. १८.६.२०१० चा अपीलकर्त्याचा अर्ज असून दि. ३.११.२०१० रोजी माहिती टपालाने पाठविली.

अपिलीय प्राधिकारी- जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे श्री. पाटील यानी अपील केले. दि. २०.८.२०१० पर्यंत माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी कार्यवाही केली नाही. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात, असे प्रथम अपिलावरील आदेशात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी विस्तृत स्वरुपाची तपशिलात्मक माहिती मागितली आहे. मात्र ती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले यानी विहित मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी शास्तीची जाणीव देऊन दिलेल्या आदेशानंतरही माहितीबाबतची पूर्तता त्यानी केलेली नाही. आयोगापुढील सुनावणीलाही ते उपस्थित नाहीत. या अनुपस्थितीबाबतचा व माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा शास्तीबाबतच्या म्हणण्यासह जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी ५ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपिलीय प्राधिकारी यानी दि. २२.३.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले याना आयोगाचे आदेश कळविले व श्री. एन. डी. भोसले यानी दि. २४.३.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. विहित मुदतीत माहिती न देण्याचे कोणतेही कारण त्यानी नमूद केलेले नाही. अनुपस्थितीबाबतचा त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत असून विलंबाबाबतचे त्यांचे निवेदन कोणतेही कारणे नमूद करणारे नसल्यामुळे समर्थनीय नाही. ते शास्तीस पात्र ठरतात.

माहिती खोटी असल्याबाबतचे स्पष्टीकरण अपीलकर्त्यांनी दिलेले नाही. मात्र आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करुन घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले यानी माहिती विहित मुदतीत न देता ६४ दिवस विलंबाने दिली असून विलंबाबद्दल प्रतिदिनी रु. २५०/- (६४ x २५०) रुपये १६,०००/- अशी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. एन. डी. भोसले यांच्या जुलै २०११, ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११ व नोव्हेंबर २०११ च्या अनुक्रमे ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ व डिसेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून पाच हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश तुकाराम परदेशी
५५७, घोरपडे पठ, श्रीनिवास अपार्टमेंट, अपीलकर्ता
२ रा मजला, फ्लॅट नं. ९, खडकमाळ आळी, पुणे ४११ ०४२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे ४११ ०४२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे ४११ ०४२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे श्री. भिमराव धो. खंडाळे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे श्रीमती जयश्री सोनकवडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश तुकाराम परदेशी यानी जात पडताळणीच्या अनुषंगाने नियमावलीची व सन २००१ ते २००९ या कालावधीतील अर्जांबाबतची माहिती मागितली होती. तसेच काही शासन- निर्णयांच्या प्रतीही मागितल्या होत्या. वस्तुतः ही माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांच्याच नियंत्रणाखाली असल्याचे मानता येणार नाही. तथापि माहिती देण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविण्यात आली असल्याचे उत्तराच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा प्रभारी संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३, पुणे विभाग, पुणे श्रीमती जयश्री सोनकवडे यानी दि. २२.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीत अर्ज/अपिले यावरील कार्यवाही होणे, तसेच आयोगाच्या आदेशानुसार विहित मुदतीत खुलासा/ अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. यानुसार अनुपालन न केल्यास संबंधित कारवाईस पात्र ठरतील, याची समज जन माहिती अधिकारी तथा प्रभारी संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३, पुणे विभाग, पुणे श्रीमती जयश्री सोनकवडे व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. ३, पुणे विभाग, पुणे श्री. भिमराव धो. खंडाळे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंगद केरबा लांडे
मु. धोत्रे, पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे,
पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अंगद केरबा लांडे
मु. धोत्रे, पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे,
पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. सुनिल दादाराव जाधवर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माहिती मागण्यासाठी पाठविलेले पत्र जन माहिती अधिकारी यानी स्वीकारले नाही. पोस्टाचा तसा शेरा मारुन लिफाफा परत आला. सन १९९८ पासून मी शाळेत काम करीत असून पगार पत्रकाच्या प्रती दिल्या जात नाहीत.

सहाय्यक जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांचे कोणतेही पत्र आमच्याकडे आलेले नाही. अर्ज नसल्यामुळे माहिती दिली नाही. अपीलकर्ता यानी न्यायालयात खोटे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जानुसार माहिती ८ दिवसांत पुरवावी व अपिलीय प्राधिकारी यानी त्यानुसार होणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र अपिलीय प्राधिकारी यानी विलंबाने दि. १९.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला. सहाय्यक जन माहिती अधिकारी यानी दि. १०.१.२०११ रोजी माहिती सादर केल्याचे अहवालात नमूद केले आहे. मात्र अहवालाला झालेला विलंब व योग्य तपशील नोंदविण्याबाबतचा निष्काळजीपणा याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बलभिम विजयनाथ चव्हाण
योगेश्वरी कॉम्प्लेक्स, ४६,
गोल्ड फ्रेंच रोड, सोलापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संघ मर्या., सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बलभिम विजयनाथ चव्हाण
योगेश्वरी कॉम्प्लेक्स, ४६, गोल्ड फ्रेंच रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.बी.माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संघाला शासनाकडून कोणतेही भरीव अर्थसहाय्य मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्याने उक्त अधिनियम लागू होत नाही. तसेच अपीलकर्ता श्री. बलभिम विजयनाथ चव्हाण यानी ज्यांची माहिती मागितली आहे त्यानी न्यायालयात दावा दाखल केला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संघ मर्या., सोलापूर यानी केले. संस्थेला शासनाची थेट मदत नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यानी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संघ मर्या. सोलापूर या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री. अशोक भांडवलकर यांचा प्रथम अपिलातील निर्णय रद्द करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३१ मे २०११** — **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन पोपट काकडे
मु. पो. आसनगाव, ता. जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत आसनगाव, ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९०१/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सचिन पोपट काकडे
मु. पो. आसनगाव, ता. जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, सातारा श्री. एस. बी. निकम

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत आसनगाव, ता. जि. सातारा श्रीमती एम. आर. काटवटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - श्री. सर्जेराव लोहार याना मंजूर झालेले घरकुल, त्याचा बांधकाम परवाना, अतिक्रमणे इ. संदर्भातील माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांचा दि. ४.६.२०१० चा अर्ज दि. ९.६.२०१० रोजी प्राप्त झ ााला. दि. २३.६.२०१० च्या पत्रान्वये शुल्क कळविले. शुल्क भरल्यानंतर ग्रामपंचायतीकडील सर्व माहिती दिली. घरकुल मंजुरीचा आदेश पंचायत समिती परस्पर लाभार्थ्याला पाठविते. बांधकामासाठी ग्रामपंचायतीच्या ठरावात मंजुरी आहे, पण संबंधित व्यक्ती परवाना नेण्यासाठी आलेली नाही.

संबंधित घरकुलाच्या मंजुरीची प्रत पंचायत समितीकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आसनगाव, ता. जि. सातारा श्रीमती एम. आर. काटवटे यानी अपीलकर्त्यास पुरवावी. अधिक माहिती हवी असल्यास अपीलकर्ता यांनी अभिलेखांचे अवलोकन करुन प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तुकाराम विष्णु कवडे
१७/अे, सी/३ इमारत, सूर्यलोकनगरी,
वैदवाडी, हडपसर, पुणे ४११ ०१३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र. २,
ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
ढोले पाटील रस्ता, पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),
ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
ढोले पाटील रस्ता, पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तुकाराम विष्णु कवडे
१७/अे, सी/३ इमारत, सूर्यलोकनगरी, वैदवाडी, हडपसर, पुणे

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त क्र. २,
ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
पुणे यांचे प्रतिनिधी श्री. भानुदास गणपत माने

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),
ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिरिष मधुसूदन भांगरे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी -** श्री. गणपत काशिनाथ साळुंखे

| | |
|---|---|
| | **सहाय्यक जन माहिती अधिकारी -** श्री. नामदेव पांडुरंग बजबळकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

घोरपडी गावातील अनधिकृत बांधकामांच्या व गुंठेवारीच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. तुकाराम विष्णु कवडे यानी केली.

याच स्वरुपाचे अर्ज श्री. कवडे सातत्याने करीत असून वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली आहे. तसेच अभिलेखही अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग), ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिरिष मधुसूदन भांगरे यानी अपिलकर्त्यांच्या ८ अर्जांवरील कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या प्रतींसह केले.

जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग), ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिरिष मधुसूदन भांगरे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त क्र.२, ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ज्ञानेश्वर मोळक यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

अपीलकर्ता यांच्या याच विषयातील अपील क्र. १४१९/२००८/पुणे, १४२०/२००८/पुणे, १४२४/२००८/पुणे, १४२४अ/२००८/पुणे, १४२९/२००८/पुणे, १४३०/२००८/पुणे, १४४३/२००८/पुणे, १५१४/२००८/पुणे व १४८४/२०१०/पुणे इ. मध्ये आयोगाने यापूर्वी आदेश केले आहेत. पुन:पुन्हा त्याच मागणीसाठी अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय न करता अपीलकर्ता यानी आवश्यक असल्यास सर्व संबंधित संचिकांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेणे योग्य ठरेल, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अविनाश तात्यासाहेब शिंदे
पिताश्री कॉम्प्लेक्स, वंटमुरे कॉर्नर, अपीलकर्ता
सांगली रोड, मिरज ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा.
जिल्हा निबंधक वर्ग-१, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह. दुय्यम निबंधक (वर्ग-२),
मिरज क्र. १, सांगली यांचे कार्यालय, राजवाडा कंपौंड, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७५/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी**
तथा सहा. जिल्हा निबंधक वर्ग-१,
सांगली श्री. प्रभाकर दगडोबा शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा सह. दुय्यम निबंधक (वर्ग-२),
मिरज क्र. १, सांगली यांचे कार्यालय, राजवाडा कंपौंड,
सांगली श्री. अशोक शंकर चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिति - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका दस्ताला आवश्यक असलेली कागदपत्रे सोबत जोडली नसल्याचे निष्पन्न झाल्यामुळे सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेकडून ही कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. अशी मागणी करुनही व जन माहिती अधिकारी यानी आयुक्त, सांगली-मिरज महापालिका याना कळवूनही कागदपत्रे मिळाली नाहीत. अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अविनाश तात्यासाहेब शिंदे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्यांच्या दि. २४.२.२०१० च्या अर्जाला दि. २३.३.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देण्यात आले. एकूण २७ मुद्दयांची माहिती त्यानी मागितली असून त्यात कायद्यातील तरतुदींबद्दलचा अभिप्राय, स्पष्टीकरण याबरोबरच काही भाष्य करुन त्याला पूरक अशी अपेक्षित माहिती मागितली आहे. आमच्या कार्यालयाकडील माहिती दिली असून ऊर्वरित मुद्दयांबाबत अर्जाची प्रत महापालिकेकडे रवाना करुन तसे अपीलकर्त्यास कळविले, असे प्रतिप्रादन जन माहिती अधिकारी तथा सह. दुय्यम निबंधक (वर्ग-२), मिरज क्र. १, सांगली यांचे कार्यालय, राजवाडा कंपौंड, सांगली श्री. अशोक शंकर चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा सहा. जिल्हा निबंधक वर्ग-१, सांगली श्री. प्रभाकर दगडोबा शेळके यांनी केले.

अपीलकर्ता यानी अनेक विधाने करुन त्याला पुष्टी देणारी अशा स्वरुपाची माहिती मिळावी अशी मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत अशा बाबी येत नाहीत. तथापि या संज्ञेनुसार देय ठरणाऱ्या माहितीबाबत व अपीलकर्त्यांच्या अर्जाबाबत महानगरपालिकेने केलेली कार्यवाही स्पष्ट होणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी यानी आयुक्त, सांगली-मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका सांगली याना दि. १३.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये अवगत करुनही अद्याप असा अहवाल सादर करण्यात आलेला नाही. अपीलकर्त्यांची मागणी लक्षात घेता संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्याना प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपीलकर्त्याच्या अर्जातील माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्त, सांगली-मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका सांगली यानी दि. ३०.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**प्रत,**

आयुक्त, सांगली-मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका सांगली याना माहितीसाठी

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव बाबुराव लादे
१०१, बुधवार पेठ, कराड, ता. कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५५/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. आनंदराव बाबुराव लादे
१०१, बुधवार पेठ, कराड, ता. कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. सोनाप्पा यमगर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती वैशाली राजमाने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमीन प्रकरणातील दि. ३०.४.१९६४ च्या आदेशाची दोन प्रतीत प्रमाणित नक्कल मिळावी अशी मागणी केली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- सन १९६४ मधील मूळ आदेश असून आमच्या कार्यालयाकडे असलेल्या छायांकित प्रतीवरुन आदेशाची प्रत दिली. परंतु त्याची प्रमाणित प्रत देता येत नसल्याचे कळविले. उपविभागीय अधिकारी, कराड यांच्याकडे विचारणा केली असता आदेशाची मूळ प्रत त्यांच्याकडेही उपलब्ध नाही. उप विभागीय अधिकारी, सातारा यांच्या कार्यालयात शोध घेऊन अपीलकर्त्यास कळविण्यात येईल.

छायांकित प्रतीवरुन प्रमाणित प्रत न देण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे. तसेच माहितीच्या अधिकारात एकाच अभिलेखाच्या एकाहून अधिक प्रती मागणे योग्य नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्रीमती वैशाली राजमाने व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. सोनाप्पा यमगर यांच्या निवेदनानुसार उपविभागीय अधिकारी, सातारा यांच्या कार्यालयात शोध घेऊन अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर मोहन गायकवाड
मु. पो. डोणगांव, ता. उत्तर सोलापूर
जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग क्र. १, जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग क्र. १, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३००३/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर मोहन गायकवाड
मु. पो. डोणगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग क्र. १, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एन. डी. भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सन १९८६ ते १९९० या कालावधीतील हंगामी मजुरांची हजेरीपत्रके आदि माहिती मागितली होती. रोजगार हमी योजनेत काम केलेल्या मजुरांना कायम न करता इतरांना नेमण्यात आले. अनियमितता असल्यामुळे माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी- २० वर्षांपूर्वीची व ४ वर्षांच्या काळातील माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. त्यांच्या दि. २७.८.२०१० च्या अर्जानुसार अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर दि. ८.११.२०१० रोजी माहिती दिली. मुंबईहून शासन स्तरावरुन व जिल्हा स्तरावरुन माहिती गोळा करुन दिली. त्यामुळे विलंब झाला. अपीलकर्ता रोज कार्यालयात येतात.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार माहिती देण्यास ३० दिवसांची मुदत असून जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र. १, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एन. डी. भोसले यानी ४१ दिवस विलंबाने माहिती दिली. दि. ८.११.२०१० च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे त्यानी म्हटले असले, तरी उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रातील वस्तुस्थिती वेगळे दर्शविते. दि. ८.११.२०१० पर्यंत माहिती देण्याचे दि. १.११.२०१० रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीवेळी ठरले, असे अपील निर्णयात म्हटले आहे. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि. ८.११.२०१० च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली व अपिलीय प्राधिकारी यानी दि. १६.११.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी श्री. एन.डी.भोसले याना विलंबाबाबत 'समज व परिणामास जबाबदार' राहण्याची जाणीव दिली. जन माहिती अधिकारी यानी दि. ८.११.१० या तारखेच्या पत्राने दिलेली माहिती गटविकास अधिकारी कार्यालयात दि. १८.११.२०१० रोजी प्राप्त झाल्याचा शिक्का आहे व गटविकास अधिकारी यानी दि. २६.११.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास ही माहिती पाठविली, असे कागदपत्रांवरुन दिसून येते. दिलेली एक पानी माहिती पाहता ती मुंबईहून, जिल्हा स्तरावरुन अशा विविध ठिकाणांहून विशेष परिश्रमपूर्वक गोळा करावी लागल्याचे दिसत नाही. परिणामी जन माहिती अधिकारी श्री. एन. डी. भोसले यानी माहिती देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही न करता कुचराई केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, बांधकाम उपविभाग, उत्तर सोलापूर, जिल्हा परिषद, जि. सोलापूर श्री. एन. डी. भोसले यानी माहिती विहित मुदतीत न देता ४१ दिवस विलंबाने दिली असून विलंबाबद्दल प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे ( ४१ x २५०) रुपये १०,२५०/- अशी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. एन. डी. भोसले यांच्या जुलै २०११ व ऑगस्ट २०११ च्या अनुक्रमे ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून दोन हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश किसनराव भुजबळ
व्दारा श्रीकृष्णा मोबाईल शॉपी,
मु. पो. वेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
ता. जुन्नर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषी अधिकारी,
ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुरेश किसनराव भुजबळ
व्दारा श्रीकृष्णा मोबाईल शॉपी,
मु. पो. वेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
ता. जुन्नर, जि. पुणे श्री. डी. एस. देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -मंडल कृषी कार्यालयांतर्गत कामांची एप्रिल २००८ ते मार्च २०१० या कालावधीतील माहिती दि.१२.६.२०१०च्या अर्जाद्वारे मागितली होती. दि. १६.६.२०१० च्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यानी रु. ४९६४/- शुल्क कळविले. दि. २९.६.२००६ रोजी शुल्क भरल्यानंतर दि. २६.७.२०१० रोजी म्हणजे विलंबाने माहिती दिली व शुल्क जादा आकारले.

अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. २६०० पृष्ठांची माहिती संकलित करुन दिली. त्यामुळे विलंब झाला. पृष्ठांची संख्या लक्षात घेता शुल्क आकारणी जादा नसून कमी आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती कामांच्या छायाचित्रासह मागितली आहे. अशा प्रकारे छायाचित्रे काढून देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली शुल्क आकारणी योग्य असून शुल्क भरल्यानंतर छायांकित प्रती काढण्याची कृती योग्य व विलंब समर्थनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येतआहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. यशवंत रावजी जगताप
मु. पो. कार्‍हाटी, ता. बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती बारामती, ता. बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्‍हाटी, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. यशवंत रावजी जगताप
मु. पो. कार्‍हाटी, ता. बारामती, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती बारामती, ता. बारामती, जि. पुणे श्री. भानुदास शाहू साळवे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्‍हाटी, ता. बारामती, जि. पुणे श्री. सोमनाथ शंकर थोरात

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. यशवंत रावजी जगताप यानी घरकुलासंबंधीची व अन्य व्यक्तींच्या घरांबाबतच्या सन २००१ ते २००८ या कालावधीतील कागदपत्रांची मागणी केली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे निवृत्त झाले असून त्यानंतर शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्‍हाटी, ता. बारामती, जि. पुणे श्री. सोमनाथ शंकर थोरात व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती बारामती, ता. बारामती, जि. पुणे श्री. भानुदास शाहू साळवे यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. धोंडीराम ज्ञानोबा मुंडे
फलॅट नं. १९, एफ विंग, प्रथमेशनगरी, अपीलकर्ता
आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** डॉ. धोंडीराम ज्ञानोबा मुंडे
फलॅट नं. १९, एफ विंग, प्रथमेशनगरी, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी डॉ. श्रीमती सी.ए.कांते

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
यांचे प्रतिनिधी डॉ. श्रीमती सी.ए.कांते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माझ्या पत्नी डॉ. उर्मिला कानवडे (मुंडे) यांच्या सन १९९२ मधील विशेष प्रसूती रजेबाबतचा अर्ज गेल्या साडेतीन वर्षापासून प्रलंबित आहे. फक्त प्रसूती रजा मंजूर केली गेली. विशेष रजा एक दिवसाचा खंड असल्यामुळे त्यावेळी मंजूर झाली नाही. ती आता मंजूर व्हावी. अर्ज अद्याप प्रलंबित का आहे याची कारणे द्यावीत.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी- संबंधित प्रकरण १९ वर्षांपूर्वीच्या रजेचे आहे. अस्थायी पद असल्यामुळे त्यावेळी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याने रजा मंजूर केलेली नसून प्रकरण संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. तसे अपीलकर्त्यास वेळोवेळी कळविले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अनुषंगिक माहिती त्याना देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३१ मे २०११**